# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.२० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०५) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०६) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०७) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(११) श्री.  पांडे विनायक प्रभाकर
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>संवाद :</u>

श्री.मुजेब खान : हे ऐतिहासिक शहर आहे. मागील बॉडीच्या काळात काही निर्णय झोलेले आहेत. त्यावेळी काही लोकांनी रमजनमध्ये भरणाऱ्या मीना बाजराला चुकीची प्रथा पाडली. जुने सदस्य होते. त्यावेळेस स.सदस्य श्री.खैरे, श्री.सावे, श्री.काळे यांनी मीना बाजरासाठी भेदभाव केला नव्हता. परंतु खंत वाटते की, काही समाजतील लोकच समाजला बिघडवतात. मीना बाजरासाठी आपण निविदा काढतो, रस्त्याची जगा निविदा काढून देतो. हे योग्य नाही. पुर्वी ज्या पध्दतीने देत होतो त्याच पध्दतीने सात-आठ दिवस मीना बाजरासाठी साधारणत: ५०० ते ८०० रूपये पर्यंत देत होतो. परंतु आता लाख-दीड लाखापर्यंत जतो. त्यावेळी प्रकरण न्यायप्रविष्टही झाले होते. मा.न्यायालयाने या संदर्भात निर्देशही दिलेले होते. त्यावेळचे सदस्य श्री.हिदायत अली व तकी हसन खान यांनी निविदा काढण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवला होता. त्यांनी समाजविरोधी काम केलेले आहे. नागरीकांच्या धार्मिक, सार्वजनिक उत्सवात निविदा मागवून देणे योग्य नाही. कोणताही उत्सव असो त्याची निविदा काढू नये. या संदर्भात मा.सभापती ऐतिहासिक निर्णय देतील. पुर्वी ज्या पध्दतीने नाममात्र रकमेवर देण्यात येत असे त्याचप्रमाणे देण्यात यावे.

श्री.अजिजजहागिरदार : स.सदस्यांनी ज्या दोन तत्कालीन सदस्यांच्या नांवाचा उल्लेख केलेला आहे त्यांचे नांव कमी करून उर्वरीत बाबीला माझा पाठींबा आहे.

श्री.नासेर नाहदी : शहागंज येथील मीना बाजराचे संदर्भात मागच्या वर्षी ज्या चुका झाल्या त्याची पुनरावृत्ती करू नये. त्यावेळेस काही माजे स.सदस्यांनी यात राजकारण आणून सर्वसाधारण सभा, अधिकारी व पदाधिकारी यांची दिशाभूल करून निविदा काढल्या गेल्या होत्या. ते चुकीचे होते. शहरात अनेक उत्सव होतात. मंडप लावण्यात येतात, कार्यक्रमही होतात. महानगरपालिका कोठेही कर आकारणी करत नाही किंवा निविदा काढत नाही. १५-२० वर्षांपासून तेथे बाजर भरतो. तेथे येणारे सर्वच गरीब स्तरातील लोक येतात. त्यांना या ठिकाणी सर्व प्रकारच्या वस्तू स्वस्त दरात मिळतात. हे लोक मोठमोठ्या दुकानात जवून घेऊ शकत नाही. त्या ठिकाणी माजे नगरसेवकांना बोलावण्यात येत नव्हते. त्यांचा सत्कार होत नव्हता. या कारणामुळे त्यांनी सर्वसाधारण सभेत निविदा काढण्याचा प्रस्ताव ठेवला होता. एस.टी.बस स्टँडची जगा देखील मिळते. मा.उच्च न्यायालयाने देखील त्याच कमिटीला बाजर दिला. त्यांना १५ वर्षांचा अनुभव आहे. काही माजे नगरसेवकांनी निविदा काढायला लावून एक-एक लाख रूपये आकारणी होते. मागे झालेल्या चूकांची पुनरावृत्ती करू नये. मागच्या वेळेला जेठरवले होते तेवढे पैसे भरून बाजर दिला. त्यावेळी शहरातील काही मोठ्या लोकांनी देणगी देऊन पैसे भरले होते. विनंती की निविदा रद्द करावी. सामाजिक कार्य आहे. अनुभवी संस्थेला मीना बाजर देण्यात यावा.

श्री.मीलींद दाभाडे : रमजन महिन्यात मीना बाजर भरविण्यात येतो. त्या ठिकाणी सर्व जती धर्माचे पंथाचे लोक येतात. काही लोक निविदा काढून बाजर संपवण्याचे कुटील कारस्थान करीत आहेत. निविदा रक्कम जस्त झाली तर तेथील सामानाची जस्त दराने विक्री होईल. सदर प्रकरणात अल्प रक्कमेवर बाजर देण्यात यावा व तणाव थांबवावा.

श्री.रेणुकादास वैद्य : मीना बाजर येथे सर्व जती धर्माचे सामान्य लोक जतात. पूर्वी कधी निविदा काढण्यात येत नव्हत्या. पारंपारिक पध्दतीने मीना बाजर देण्यात यावा. महानगरपालिकेचा महसूल न बुडवता थोडेफार वाढवून देण्यात यावे.

श्री.साहेबराव कावडे : मीना बाजरात येणारे सर्व व्यापारी फायद्याशिवाय विकत नाही. ते दोन पैशाने स्वस्त देणार नाही. ते कमी फायद्यावर धंदा करतील का? नागरीकांचे नांव पुढे करून महानगरपालिकेचे का नुकसान करण्यात येते?

श्री.मुजेब खान : स.सदस्यांची बोलण्याची भावना वेगळी आहे. त्यांना बोलायचे वेगळे होते. महानगरपालिकेच्या फायद्यासाठी कोणतेही सार्वजनिक उत्सवात अशी कारवाई होणे योग्य नाही. बाहेरचे लोकांमध्ये महानगरपालिकेची प्रतिमा चांगली राहायला पाहिजे मा.सभापतींना विनंती की, त्यांनी निर्णय द्यावा.

श्री.रविकांत गवळी : रमजन महिन्यात भरणाऱ्या मीना बाजराबद्दल स.सदस्यांच्या भावना योग्य आहेत. निविदा पध्दत रद्द करून सर्वांनाच फायदा व्हावा.

श्री. नासेर नाहदी : मागील वर्षी निविदा काढण्यात आल्या होत्या. ७० हजराची निविदा होती आणि ३०-३५ हजर रूपये वृत्तपत्रातील जहिरातीचा खर्च आला.

मा. सभापती : मीना बाजराच्या संदर्भात सभागृहाने आपल्या भावना व्यक्त केल्या. ही बाब महसूल विभागाशी निगडीत आहे. याबाबत उप आयुक्त (महसूल) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : दरवर्षी रमजन ईद पूर्वी मीना बाजर भरविण्यात येतो. मागील वर्षी निविदा प्रमाणे ७२ हजर रूपये निश्चित करण्यात आले होते. प्रती दिवस रूपये ८०००/- आकारणी केली होती. या संदर्भात संस्थेच्या प्रतिनिधींनी चर्चा केली. बाजर देण्याच्या संदर्भात आधारभूत किंमत रू.१२,०००/- प्रती दिवसाप्रमाणे रू.१,२०,०००/- इतकी रक्कमेबाबत अर्ज आलेला आहे. आधारभूत किंमत रू.८८००/- प्रती दिवस प्रमाणे निविदा काढली. प्रशासनाकडून एक लाखाच्या वर उत्पन्न अपेक्षित आहे. योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. सभापती : मीना बाजर संदर्भात सांगावयाचे झाल्यास बाजर हा शब्द चुकीचा वाटतो. रमजनचा महिना पवित्र आहे. त्यानंतर ईद होईल. शहरात विविध यात्रा उत्सव प्रसंगी गणपती, नवरात्र च्या वेळी स्टॉल लावण्यात येतात. त्याप्रमाणे येथे स्टॉल लागतात. प्रशासनाने गेल्या वर्षी निर्णय घेतला असेल. रस्त्यावर बाजर भरवता येतो का, हे पाहणे आवश्यक आहे. जर येत नसेल तर निविदा काढता येईल का? तांत्रिकदृष्ट्या पाहिले तर हे सर्व चुकीचे दिसते. सार्वजनिक उत्सवात एकीकडे आपण पाणी, विद्युत, अग्निशमन सेवा पुरविण्याची व्यवस्था करतो व तेथूनच महसूल मिळेल अशी अपेक्षा करणे ही बाब चुकीची आहे. जनतेसमोर असा संदेश जऊ नये. सर्वसाधारण जनतेचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. यात्रा समिती असो किंवा कुणी असो, व्यापारी दृष्टीकोण ठेवू नये, धार्मिक भावनेला तडा जवू नये अशी सभागृहाची भावना आहे. प्रशासनाला प्रशासनाच्या बाजूने निर्णय घ्यायचा असल्यास त्यांनी वेगळा घ्यावा. धोरण ठरवावे लागे. पैसे कमविण्याची बाब नसून जनतेला समान न्याय मिळाला पाहिजे. कुणाचे फोन, दबाव काही अडचण असेल त्याला बळी पडू नये. या सभागृहाची व सर्वसाधारण सभेची भावना लक्षात घ्यावी. जनतेत चांगला संदेश जवा. याचे मा.महापौर यांच्या हस्तेउद्घाटन करावे. प्रशासनाला सूचना देण्यात येते की, महानगरपालिकेतर्फे सर्व सुविधा द्यावी. संघर्ष होणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.मुजीब खान : मा.सभापतींनी भावना व्यक्त केली. आपल्या भावनेचा आदर करतो. प्रशासनाला संदिग्धता वाटायला नको की, आपण भावना व्यक्त केली की निर्णय दिला. मी मा.आयुक्तांना भेटलो होतो. त्यांनी सांगितले होते की, सदर बाबतीत स्थायी समितीच्या स्तरावर निर्णय व्हावा. तरी विनंती की कृपया आपण निर्णय द्यावा.

श्री.साहेबराव कावडे : यास आमचा विरोध नाही. कुणी व्यापारी दोन पैसे कमी दराने देत असेल तर त्यास पाठींबा आहे. मी दरवर्षी इफ्तार पार्टी करतो परंतु दरात फरक दिसत नाही.

मा. सभापती : स.सदस्य श्री.मुजीब आलमशाह यांनी हा निर्णय की भावना आहे असे मत व्यक्त केले. सर्व स.सदस्यांच्या भावना विचारात घेवून निर्णय दिला. प्रशासनाला सूचना देण्यात येते की, सर्वसाधारण सभेने जहीर निविदा काढण्याबाबत निर्णय घेतलेला होता. त्यावेळेस कोणत्या परिस्थितीत हा निर्णय घेतला ते पहावे लागेल. सर्वसाधारण सभेचा निर्णय बदलावयाचा असेल तर मा.महापौर यांच्या दालनात सर्वांनाच विश्वासात घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने विचार व्हावा.

बाजराची निविदा काढू नये. स्थगितीची सूचना करण्यात येते. उद्याच सर्वसाधारण सभा आहे. मा.महापौर यांचेसोबत निर्णय घेऊ.

श्री.मुजीब खान : प्रशासनाला व सभागृहाला निर्णय घेण्याचा आपापला अधिकार आहे. आताही आपले मत वाटते निर्णय दिल्याचे वाटत नाही. आता फक्त आठ-दहा दिवसांचा वेळ राहिलेला आहे. कधी महापौर दालन, कधी आयुक्तांकडे, कधी सभागृहात यापेक्षा आम्ही महानगरपालिकेकडे जस्त रक्कमेची निविदा भरली असती तर अशी वेळ आली नसती. हे आम्ही सहन करणार नाही. काय निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

सौ.लता दलाल : मीना बाजर जेथे भरतो तो विकास योजनेचा रस्ता आहे. गोरगरीब जनता तेथे येते. माझा मुद्दा महानगरपालिकेचे नुकसान व्हावे असे नाही. सर्वजण तेथे येतात, निविदा न काढता एक ठोक रक्कम ठरवून घ्यावी. व्यापाऱ्यांनाही असे वाटू नये की त्यांना महानगरपालिकेचे देणे आहे. या ठिकाणी विविध धर्म, पंथाचे व्यापारी व ग्राहक असतात. महानगरपालिकेचेही नुकसान होऊ नये व व्यापाऱ्यांनाही मोफत दिल्याचे वाटू नये. सर्व बाजूंनी विचार करून निविदा न काढता ठोक रक्कम आकारणी करावी.

श्री.मीलींद दाभाडे : मागच्या वर्षी जे उत्पन्न मिळाले त्यात जहीरात खर्च कमी करून तेवढ्या रक्कमेवर देण्यात यावे. मागील १५ वर्षापासून जेचालवतात त्यांना देण्यात यावे.

श्री.दिलीप गायकवाड : निविदा रद्द करावी.

श्री.मुजीब खान : विषयपत्रिका चालू करावी. पैसा तर कुणीही देईल. परंतु भावनेचा प्रश्न आहे, उत्सवाचा आहे. भावनांना ठेच पोहचू नये.

मा. सभापती : स.सदस्य श्री.मुजीब खान यांना स्पष्टपणे सांगण्यात येते की, या सभागृहातून सर्वधर्म समभावाचा संदेश जवा. लाख-दोन लाखाचा प्रश्न नाही. वेगळ्या दिशेने नेवू नये. कृपया याची नोंद घ्यावी.

श्री.मुजीब खान : मागे जी चुक झाली ती पुन्हा होऊ नये. चुकीची दुरूस्ती व्हावी ही विनंती आहे. ऐतिहासिक निर्णय घ्यावा. कोणीही असो दबाव येऊ नये.

मा. आयुक्त : मागील वर्षी सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केला आहे. त्यावेळी थोडा उशीर झाला होता. सर्वसाधारण सभेचे निर्णय बंधनकारक आहे. त्यामुळे निविदा काढली. आम्ही दर ठरवतो. त्यापेक्षा जस्त निविदा दर अपेक्षित असते. तीन-तीन वेळा निविदा काढून निविदा येत नाही. निविदा काढणे प्रशासनाला बंधनकारक होते म्हणून निविदा काढल्या. विना निविदा द्यायचे असेल तर त्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. मागच्या वेळेसची रक्कम आधारभूत रक्कम मानून किती रक्कमेवर विना निविदा द्यायचे व कुणास द्यायचे, स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय देता येणार नाही.

श्री.मुजीब खान : माझ्या म्हणण्याचा अर्थ वेगळा आहे. इतर उत्सवात आजपर्यंत निविदा काढून वसूली झालेली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस असो, नवरात्रोत्सव असो किंवा गणेशोत्सव असो. सर्व सुविधा पुरविण्यात यावे असे सांगण्यात आले. तेथून उत्पन्न घ्यावे अशी भावना नाही. पैशाचा प्रश्न नाही, सहा-सात दिवसांचा प्रश्न आहे. हा नियमित बाजर नाही. समाजची भावना लक्षात घेवून मानधन म्हणून घ्यावे. दहा-वीस टक्के वाढवून घेवू नये. एखाद्या

समाजबरोबर अन्याय होऊ नये. आणि या राजकारण होऊ नये. म्हणून मी हे ठोस निर्णय घेण्याबद्दल स्पष्ट केलेले आहे.

मा. सभापती : सभागृहाच्या भावनांचा व सूचनांचा आदर करून स्थायी समितीच्या वतीने प्रशासनाला सूचना देण्यात येते की, अनेक वर्षांची परंपरा खंडीत होऊन प्राप्त परिस्थितीत निर्णय घेण्यात येतो की, प्रशासनाने सर्व सूचनांचा आदर करावा. सदर निविदा स्विकारणे किंवा फेटाळणे याचे अधिकार आयुक्तांना आहेत. त्यास कायदेशीर अडचण येणार नाही. आपले अधिकारात निविदा रद्द करावी. यात्रा/उरूस समिती, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांना विश्वासात घेवून मा.महापौर व आपण निर्णय घ्यावा. कोणतीही व्यक्ती डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात येत नाही. आवश्यकता असल्यास वर्तमानपत्रातून खुलासा करण्यात यावा.

श्री.मुजेब खान : संस्थेला कसे द्यावे याबद्दल सांगितलेले नाही.

मा. सभापती : निविदाला स्थगिती दिली. जेसमोर येतील त्यांचेशी चर्चा करण्यात येईल.

श्री.मुजेब खान : मानधन म्हणून घ्यावे. वसुली म्हणून नाही. कोणत्याही अटी न टाकता स्पष्टपणे निर्णय घेण्यात यावा व जी संस्था हे काम करत आलेली आहे त्यांचा विचार व्हावा.

मा. सभापती : आपण निर्णय घेऊन प्रशासनाला स्पष्ट आदेश दिलेले आहे. न्यायालयात जण्यास संधी मिळणार नाही. मा. आयुक्त अंमलबजवणी करतील. मा.महापौरांची सहमती घेऊ. जी संस्था वर्षानुवर्षे हे काम करते त्यांचेशी चर्चा करून ठरवावे. जी रक्कम ठरविण्यात येईल त्यापेक्षा जस्त वसूल केले तर कार्यवाही करावी. निविदा रद्द करण्यात येते.

सौ. लता दलाल : पहिल्या सभेपासून मी वाहनतळाच्या संदर्भात विचारणा करते. मला अद्याप उत्तर मिळालेले नाही. मी धरणे धरणार आहे. एकाच विषयावर किती वेळेस बोलायचे?

श्री.मुजेब खान : मी यास अनुमोदन देत आहे. स.सदस्यांची जे भावना आहे ती आमची सर्वांची भावना आहे.

(यावेळी स.सदस्या सौ.लता दलाल यांचेसह श्री.मुजेब आलमशाह खान, श्री.दिलीप गायकवाड, श्री.नासेर नाहदी, श्री.मीलींद दाभाडे, श्री.अजिजजहागिरदार हे मा.सभापतींसमोर धरणे धरून बसतात.)

श्री.रविकांत गवळी : सभते माहिती विचारली तर पुढच्या वेळी देण्यात येईल असे सांगण्यात येते. अहवाल मिळत नाही ही खेदाची गोष्ट आहे.

श्री.शशांक विसपुते : नगर रचना विभाग व प्रशासकीय विभागास गेल्यास सहा महिन्यापासून प्रश्न विचारत आहे परंतु त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. चुकीचे उत्तर देण्यात येते. त्यांचेवर ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री. मुजेब खान : जेष्ठ सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला त्यास आमचा पाठींबा आहे. ७० कोटी विकास कामांसाठी ठेवलेले आहेत. या कामाच्या निविदा कुठपर्यंत आल्या? गोलमोल उत्तरे देण्यात येतात. नुसती चर्चा होते.

मा. सभापती : सर्व स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. औरंगपुरा, निराला बाजर येथील वाहनतळाच्या जगे संदर्भात.

श्री.दिलीप गायकवाड : बागशेरजंग भागात अनधिकृत भूखंडाची विक्री चालू आहे आणि बांधकामही चालू आहे.

श्री.शशांक विसपुते : नगर रचना विभागाने कळस गाठलेला आहे. २००३ मध्ये चईक्षेत्र निर्देशांक देण्यात आले आणि २००५ मध्ये त्याच जगेचे १.२९ कोटी देण्याची कार्यवाही होत आहे. अशा अधिकाऱ्यांना निलंबीत करावे.

श्री.मीलींद दाभाडे : स.सदस्या सौ.लता दलाल या अनुभवी व अभ्यासू आहेत. त्यांच्या प्रश्नाला देखील गांभीर्याने घेत नाही. सालारजंग बागशेरजंग, निर्मल असोसिएटस्‌वर कारवाई नाही. प्रशासन का घाबरते?

मा. सभापती : स.सदस्यांना विनंती करण्यात येते की, कृपया आपण आपले आसन ग्रहन करावे. आपल्या भावनांशी मी सहमत आहे. उत्तर देण्याबाबत मी प्रशासनाला सूचना करतो.

सौ.लता दलाल : आपल्या शब्दांचा मान ठेवून आम्ही धरणे मागे घेतो. कारवाई व्हावी, खुलासा नको.

(यावेळी धरणे दिलेले सर्व स.सदस्य आपापल्या जगेवर स्थानापन्न होतात)

मा. सभापती : वाहनतळाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने सूचना दिलेल्या आहेत. आदेश प्राप्त होऊन अनेक वर्ष झालेली आहेत. वाहनतळा व गोडावूनच्या जगेमध्ये दुकाने काढण्यात आली. नगर रचना विभागाने मालमत्ता विभागामार्फत कारवाई करावी. अनधिकृत दुकानांचे बांधकामाबाबत मा.उच्च न्यायायाचे काय निर्देश आहेत, किती लोकांना नोटीसा दिल्या इ. आकडेवारीसह माहिती द्यावी.

सहा.संचालक न.र. : वाहनतळाच्या संदर्भात अभिलेख विभागाकडून संचिका प्राप्त करून घेण्यात आल्या. त्यातील अनियमितता पडताळून कारवाईसाठी संचिका प्रशासकीय अधिकारी यांचेकडे पाठविल्या. काय कार्यवाही झाली याबाबत प्रशासकीय अधिकारी खुलासा करतील. सि.स.नं.२०५९२ निराला बाजर या संदर्भात शासनाकडून चौकशी चालू आहे. शासनाकडून चौकशी होत असल्याने त्याच्या विपरीत मला अहवाल देता येणार नाही.

मा. सभापती : चार बाय चारच्या टपऱ्याचे काय धोरण आहे, कशा झाल्या, पाबंद का केले नाही?

सहा.संचालक न.र. : ते अनधिकृत आहेत.

उप आयुक्त (म) : औरंगपुऱ्यामध्ये आठ ते नऊ टपऱ्यांचे बांधकाम होते. संस्थेला नोटीस देऊन थांबवले. पाच सहा दिवसांपुर्वी सहा काढून घेतल्या, दोन राहिल्या. सध्या टपरीचे काम चालू नाही. नगर रचना विभागाकडून २००२ पासून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वाहनतळाबाबत अनियमितता झाल्याच्या संचिका वर्ग करण्यात आलेल्या आहेत. ११८ संचिकावर कारवाई पूर्ण होऊन ४२ संचिका प्रलंबीत आहे. विभाग प्रमुखांच्या अधिपत्याखाली विविध पथके तयार करून विशेष पोलीस बंदोबस्तात कारवाई करावी लागेल. मागे विविध उत्सवात प्रशासकीय अधिकारी यांचेकडील पोलीस काढण्यात आले. या संदर्भात मा.उच्च न्यायालयाला माहिती दिली आहे.

सौ. लता दलाल : प्रत्येक वेळी काहीतरी उत्तर देण्यात येते. गेल्या सहा महिन्यामध्ये पोलीस बंदोबस्त मिळाला नाही का? मागील सहा महिन्यात नाल्यात असलेली खुली जगा तपासली का? शासनाची चौकशी किती काळ चालेल? आपण या संदर्भात शासनाला काही स्मरणपत्र दिले का? सदर प्रकरणात स्थगिती आहे का? किती मोठ्या रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम काढले, आता आर.सी.बाफना यांचे

वास्तुचे उद्‌घाटन झाले त्याची पार्कींग कुठे आहे? रस्त्यावर वाहने उभी राहतात. नगर रचना विभागाकडून टोलवाटोलवी केली जते.

श्री.मुजीब खान : स.सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळावे. मागील तीन चार सभेपासून मी मोतीवाला ले-आऊट च्या जगेवर किती अतिक्रमण झाले, त्याचे क्षेत्र किती आहे, उप आयुक्त (महसूल) तेथे आले होते. त्यांनी टेप लावून मोजणी केली, पंचनामा केला. त्यावेळी त्यांची वागणूकीची पध्दत थोडी वेगळी होती. ती मला सहन झाली नाही. त्यांचेकडून अतिक्रमण विभागाचा कार्यभार काढून घेण्यात यावा. रोशनगेट, चंपा मस्जेद, रहेमानीया कॉलनी इ.ठिकाणचे अतिक्रमण काढावे म्हणून पत्र दिले होते. आज, उद्या करून तसेच गणपतीचे दिवस, रमजनचे दिवस अशी कारणे दाखवून काढण्यात आले नाही. त्या भागात कुणीही इमारत निरीक्षक नाही. अनधिकृत बांधकाम चालू आहे.

मा. सभापती : वाहनतळाच्या ११८ संचिकावर कारवाई पूर्ण होऊन ४२ संचिकावर कारवाई बाकी आहे. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी संपूर्ण अभिलेख प्रशासकीय विभागाला पाठविलेले आहे. न.भू.क्र.२०५९२ वर शासन स्तरावर चौकशी चालू आहे. मा.उच्च न्यायालयाचे पार्कींग आणि गोडावून यांच्या वापरात झालेल्या बदलाबाबत निर्देश आहेत. पार्कींग उपलब्ध नाही त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. ठोस कारवाई नाही. नियमानुसार आहे का त्याची खात्री करावी. स.सदस्यांचे सूचनांकडे दुर्लक्ष होते. जणीवपूर्वक उत्तर न देणे, लोकप्रतिनिधी, जनतेच्या हिताचे नाही.

मा. आयुक्त : तीन वर्षापुर्वीच्या मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे ११८ प्रकरणात कारवाई झालेली आहे. ४२ प्रलंबीत आहेत. मी बैठक घेऊन विभाग प्रमुखांना विभागून दिले. अत्यंत कठीण आणि संवेदनशील स्वरूपाचे काम आहे. पोलीस बंदोबस्त मिळालेला नाही. आपलेकडील असलेला बंदोबस्त देखील काढण्यात आलेला आहे. ४२ प्रकरणात आवश्यक कारवाईसाठी मनपात प्रशासन तत्पर आहे. १००% करू. ११८ प्रकरणाची यादी देऊ. ४२ प्रकरणाची यादी पुढच्या सभेत संबंधीताने सादर करावी. आपले प्रशासन लोकांशी निगडीत आहे. मोतीवाला प्रकरणात दुसऱ्या दिवशी कारवाई झाली. खुल्या जगेची कुंपण भिंतीचे बांधकाम शहर अभियंता यांनी करावे. त्यात कुणी अडथळा आणल्यास गुन्हा नोंदवावा. नाट्यगृह, तापडीया सर्कल बाबतचा जे मुद्दा आहे त्याला गांभीर्याने घेण्यात यावे. ४२ प्रकरणापैकी किमान ४० प्रकरणात भांडणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाची दिशा लोकहिताची आहे.

श्री. मुजीब खान : मोतीवाला फंक्शन हॉलच्या बांधकाम संदर्भात आदेश दिले होते. उप आयुक्त (म) यांनी पाहणी केली, पंचनामा केला. त्यांची काम करण्याच्या पध्दतीमुळे स.सदस्यांची भावना वेगळी होते. प्रशासनाच्या चुका दाखवून दिल्या जतात. प्रशासनाने नाही केले तर शासन करील आणि शासनानेही नाही केले तर मा.उच्च न्यायालयात जता येईल. रोशनगेट, शरीफ कॉलनी इ.भागात खूप घाण आहे. चार-चार पत्र दिले, तेथे निरीक्षक नाही. मोतीवाला फंक्शन हॉल समोरील खुल्या जगेसाठी सहाय्यक संचालक नगर रचना यांनी सिमांकन करून दिलेले आहे का? त्यांनी सिमांकन कसे केले व किती क्षेत्राचे केले?

सौ. लता दलाल : प्रशासनाने केलेला खुलासा समाधानकारक नाही. न.भू.क्र.२०५९२ संपूर्ण रेखांकनात किती चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आले. पार्कीगची जगा किती, नगर रचना विभागाकडून शासन चौकशी करते असे उत्तर मिळते. शासनाकडे काय कार्यवाही होते याची कधी चौकशी केली का? नक्की चौकशी चालू आहे का नुसता बागुलबुवा आहे? १६० कामांची मा.उच्च न्यायालयात यादी दिली. मा.उच्च न्यायालयाने असेही विषद केले की, जेथे जेथे नियम पाळले जणार नाही ते पाडावे. पोलीस बंदोबस्तात आम्ही येतो. मोठ्या बिल्डरवर कारवाई होत नाही. ८०% नियमाप्रमाणे नाही. आम्हाला माहित आहे तर प्रशासनाला का नाही. हे शहर पर्यटनाचे व जगातले मोठे शहर आहे. शहराची रूपरेषा बदलावी. प्रशासन सहकार्य करीत नसेल तर आंदोलन करण्यात येईल. नुसती कारणे दाखवली जतात. असे किती दिवस होणार, आजखुलासा व्हावा.

मा. सभापती : नाट्यगृहाला परवानगी शैक्षणिक किंवा वाणिज्य वापरासाठी परवानगी दिली? मालमता कर कोणता आकारण्यात येतो? परवानगीमध्ये नाट्यगृहाचा मुख्य दरवाज कोणत्या बाजूला आहे? न.भू.क्र.२०५९२ संदर्भात शासनाला किती वेळा पाठपुरावा केला?

सहा.संचालक न.र. : तापडीया नाट्यमंदिर या ऑडीटोरीयमला शैक्षणिक वापरासाठीच बांधकाम परवानगी आदेशात अट टाकून दिलेली आहे. ऑडीटोरीयम म्हणून भोगवटा प्रमाणपत्र दिले. शैक्षणिक वापर म्हणूनच दिले. प्रत्यक्षात जगेवर काय वापर होत आहे ते करमुल्य निर्धारण विभागाने बघावे. सि.स.नं.२०५९२ संदर्भात शासन स्तरावर चौकशी झाली. सहसंचालक, संचालक यांचेकडून त्रृट्या काढण्यात आल्या. मा.संचालक नगर रचना यांना अहवाल गेला होता.

मा. आयुक्त : सदर प्रकरणात पाठपुरावा करायला पाहिजेहोता. अर्धशासकीय पत्र लिहिण्यात यावे.

मा. सभापती : प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात येते की, वाणिज्य वापर होत आहे व भोगवटा प्रमाणपत्र शैक्षणिक वापरासाठी म्हणून दिले. संत एकनाथ रंगमंदिर येथे होणारे कार्यक्रम या ठिकाणी होत आहेत. मूठभर लोकांचे हित जेपासण्यात येते. सभागृह याबद्दल नाराजे व्यक्त करीत आहे. वाणिज्य वापराबद्दल प्रशासनाने दखल घ्यावी.

सौ. लता दलाल : संत एकनाथ रंगमंदिरचे उत्पन्न घटले. तापडीया नाट्यमंदिरात वेगवेगळे कार्यक्रम होतात. हे माहित असून सुध्दा कोणतीही कारवाई होत नाही. या सभेत निर्णय व्हावा.

उप आयुक्त (म) : ज्या उद्देशासाठी बांधकाम परवानगी दिली आहे त्याशिवाय इतर वापर होत आहे का, ही माहिती कर निर्धारक व संकलक यांचेकडून अपेक्षित आहे.

श्री.अजिजजहागिरदार : शैक्षणिक वापरासाठी बांधकाम परवानगी दिली त्याचा वापर इतर कारणासाठी होतो का?

कर निर्धा.व संकलक : या संबंधीत कागदपत्र तपासून मालमत्ता कर आकारणी बाबत काय कार्यवाही झाली ते आठ दिवसात सादर करण्यात येईल.

सौ.लता दलाल : तापडीया नाट्यमंदिरास कर आकारणी केली आहे का? झोन क्र.२ अस्तित्वात होते तेव्हापासून आहे. त्यामुळे याचे अभिलेख निश्चित उपलब्ध असतील. स्पेक कंपनीने त्यांच्या संगणकामध्ये फिड केलेले असेल.

श्री.मीलींद दाभाडे : तापडीया नाट्यमंदिराचा वापर कशासाठी होतो, याला कोणत्याही यंत्रणेची गरज नाही. या ठिकाणी अनेक कार्यक्रम होतात. सुरेखा पुणेकर यांच्या कार्यक्रमाचे पोष्टर लावण्यात येतात. त्यावर तेथील पत्ता छापलो असतो. जणीवपूर्वक टोलवाटोलवी करण्यात येत आहे.

मा. सभापती : सर्वांना जणीव आहे. कारवाई करायची की नाही हा मुळ मुद्दा आहे. तेथे वाणिज्य वापर होतो. न.भू.क्र.२०५९२, गोडावूनचा वाणिज्य वापर इत्यदी बाबतची आठ दिवसात माहिती द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : मित्रमंडळ गृहनिर्माण संस्था येथील ड्रेनेजविषयक कार्यवाही नाही. ते हस्तांतर झालेले आहे. लोकांच्या घरातून सक्तीने ड्रेनेजलाईन टाकण्यात येते.

मा. सभापती : या सभेला उप अभियंता श्री.बनकर, श्री.बनसोडे , मलेरीया विभागाचे श्री.बोराडे, उद्यान अधिक्षक श्री.भडके यांनी आजच्या सभेला उपस्थित न राहता त्यांची कामे करण्यासाठी परवानगी देण्यात येते. त्यांचे विभागाशी संबंधी त्यांचे वरीष्ठ माहिती देतील.

श्री.मुजेब खान : सि.टी.एस.नं.११२५३ मध्ये रेखांकन झालेले आहे. ३.५ एकर जगेत मुलांचे गार्डन व उर्वरीत जगेत माझे रेखांकन झालेले आहे. १९८३ मध्ये रेखांकन झालेले आहे. त्यांनी १९९३ मध्ये बदल करून घेतला. खुल्या जगेमध्ये ५ प्लॉट नवीन टाकले. आता रस्ते, ओपन स्पेस कोणत्या पध्दतीने ठेवलेली आहे. खुल्या जगेवर अतिक्रमण आहे. मालमत्ता कर ६.८२ लक्ष मिळालेला नाही. मालमत्ता कर का मिळाला नाही? बांधकाम सुरू करण्यासाठी सिमांकन दिले का?

मा. सभापती : निर्णय देण्यात येतो की, सदर मंजूर रेखांकनातील खुल्या जगेचे सिमांकन संबंधीत विभागाला देवून बांधकाम करावे. मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे.

श्री. मुजेब खान : खुल्या जगेमध्ये काहीतरी त्रृट्या निर्माण झालेल्या आहेत. नगर भूमापन अभिलेखाप्रमाणे काही भाग त्यांच्याकडे गेलेला आहे. नगर भूमापन कार्यालयात त्यांचे नांव कसे आले?

सहा.संचालक न.र. : मोतीवाला फंक्शन हॉलच्या संदर्भात खुलासा देण्यात येतो की, नगर भूमापन अभिलेख व ७/१२ वर मालकी असणे गरजेचे असते. १९८३ ला ले-आऊट मध्ये १५% खुली जगा सोडण्याची तरतूद होती. नवीन विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे १०% झाली. सुधारीत नकाशामध्ये खुली जगा कमी केली. मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहे १५% ठेवावे. नगर भूमापन कार्यालयाकडे दुरूस्ती झाली. क्षेत्र दुरूस्ती झाल्याशिवाय कार्यवाही करणे संयुक्तीक होणार नाही.

श्री.मुजेब खान : नगर भूमापन कार्यालयाचे अभिलेखावर नाव कसे आले. महानगरपालिकेची जमीन आहे.

मा. आयुक्त : सहाय्यक संचालक नगर रचना यांनी तपासणी करून घ्यावी.

कार्य.अभि.(ड्रे.वि.इ.) : स.सदस्य श्री.वैद्य यांनी मित्रमंडळ गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात विचारणा केली. सदर गृहनिर्माण संस्था १९७२ ला सेल्फ डेव्हलपमेंट अंतर्गत मंजूर केलेली आहे. विकास कामे संस्थेने करावी असे रेखांकन आदेशात अट नमूद कलेली आहे. १९७२ ला जलनि:सारण वाहिन्या वाय शेपमध्ये बाजूला नाल्यात व्यवस्था करण्यात आली होती. ४० ते ५० मीटर मेन लाईनला मिळवीले. प्लॉटमधून जी

ड्रेनेजलाईन टाकण्यात आली होती ती अनधिकृतरित्या तोडण्यात आली. त्याची दिशा बदलून रस्त्यावरून टाकल्यास साडेचार लाख रूपये खर्च अपेक्षीत आहे. त्यांना सात दिवसांची सूचना देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊ. एकंदरीत ड्रेनेज लाईन चांगली आहे. त्यांनी तोडल्यामुळे प्रश्न निर्माण झालेला आहे.

मा. सभापती : हे शहर ३० ते ३५ टक्के सेल्फ डेव्हलपमेंट अंतर्गत विकसित झालेले आहे. सेल्फ डेव्हलपमेंट झाल्यानंतर तीन-चार वर्षानंतर रस्ते, विद्युत, ड्रेनेज इ. कामे महानगरपालिकेने करावयाची असतात. अनेक वसाहतीत काम केलेले आहे. हा नियमाला धरूनच प्रश्न आहे. माझी मा.आयुक्तांना सूचना आहे की, सेल्फ डेव्हलपमेंट अंतर्गत सोसायटीवर किती दिवस जबाबदारी असते व भोगवटा प्रमाणपत्र घेतल्यानंतर कुणी काम करायचे असते?

मा. आयुक्त : सुरूवातीला अंतर्गत विकासाची कामे ते स्वत: करतात. हस्तांतर झाल्यानंतर आपण देखभाल दुरूस्ती करतो. सदर प्रकरणात ड्रेनेजलाईनचा प्रश्न आहे. त्यांचे म्हणणे आहे की, बाहेरून ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी. बाहेरून ड्रेनेज लाईन टाकल्यास सुमारे ४.५० लाख रूपये खर्च होईल अन्यथा ४०-५० हजारामध्ये काम होईल.

श्री.रेणुकादास वैद्य : ड्रेनेजलाईन उजव्या बाजूला आहे व आता प्रश्न डाव्या बाजूचा आहे.

मा. आयुक्त : त्यांनी आक्षेप घ्यावा, आम्ही निर्णय घेऊ.

श्री.कंवरसिंग बैनाडे : माझ्याकडे सेल्फ डेव्हलपमेंटच्या ४५ सोसायट्या आहेत. विद्युत विभागाकडे माझ्या संचिका पडलेल्या आहेत. १२ सोसायट्या २०-२० वर्षापुर्वीच्या आहेत. नवीन तेथे करू नका. जुन्या सोसायट्यातील ड्रेनेजइत्यादी कामे स्वेच्छा निधीतून करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : मित्रमंडळ गृहनिर्माण संस्थेत कार्यकारी अभियंता जेथे ड्रेनेजलाईन टाकावयाचे सांगतात त्या ठिकाणी लेवल घेतले का? व तेथे लेवल मिळते का?

मा. सभापती : सर्व काम करण्याच्या सूचना देण्यात येतील. मी स्वत:, मा.आयुक्त, कार्यकारी अभियंता व संबंधीत नगरसेवक स्थळपाहणी करून तांत्रिक बाबी तपासून योग्य त्या सूचना देण्यात येतील. स.सदस्य श्री.बैनाडे यांनी जे मुद्दा उपस्थित केला पुर्वी जेथे जेथे विद्युतचे काम केलेले आहे तेथे करण्यास हरकत नाही. ज्या वसाहती हस्तांतरीत झालेल्या आहेत त्या ठिकाणी ड्रेनेज देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात येते. तीन्ही कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात येते की, दिलेल्या सूचनांची अंमलबजवणी करावी. अधिक्षक अभियंता व मा.आयुक्तांनी सहमती दिली. अंदाजपत्रके सादर करावीत.

श्री.मुजीब खान : जकातीच्या संदर्भात उप आयुक्त (महसूल) यांनी मला उत्तर दिलेले आहे. पहिले दिलेले उत्तर व आताचे उत्तर यामध्ये तफावत दिसते. मी वाहनाचा सविस्तर तपशील दिला होता. तीन दिवस वाहन उभे करून ठेवण्यात आले. चॉकलेट, सिगारेट व आणखी गाडीत काय काय होते? वाहनात ७ लाखाचा माल होता. मला देण्यात आलेले उत्तर गोलमाल आहे.

मा. सभापती : जकात विभागात ११० ते ११५ कर्मचारी आहेत. तक्रारी बरोबर आहेत. मालमत्ता सर्वेक्षण व कर वसुलीसाठी कर्मचारी कमी आहेत. नोकर भरतीची परवानगी नाही. आपल्या महानगरपालिका प्रशासनाने अहमदनगर, जळगांव, अकोला, सांगली या ठिकाणी खाजगीकरण झालेले आहे त्या दिशेने विचार

करावा. उत्पन्नात वाढ होईल. एक महिन्यात अहवाल ठेवावा. शासनाने परवानगी दिलेली आहे.

श्री.रविकांत गवळी : मागील दहा वर्षात दोन वेळा हर्सूल तलाव ओव्हरफ्लो झालेला आहे. सांडव्याच्या लगत जे घरे आहेत त्यांना नोटीसा देण्यात याव्यात. एक महिन्यात खाली करण्याच्या सूचना द्याव्यात. हे प्रकरण सहा महिन्यापासून प्रलंबीत आहे. खुलासा केलेला नाही.

मा. आयुक्त : संबंधीत लोक तिथे राहतात, हर्सूल तलाव भरल्यानंतर सांडव्यातून पाणी घरात शिरणार. सुरक्षिततेच्या दृष्टीने तेथे राहणे योग्य नाही. तेथून स्थलांतर होणे आवश्यक आहे. त्यांच्या जिविताला धोका आहे. एक तर हे अतिक्रमण असतील किंवा विकत घेवून राहात असतील. जर विकत घेतलेले असेल तर ज्यांनी ते विकले त्यांना विक्रीचा अधिकार होता का? बांधकाम परवानगी घेवून बांधकाम केले का? जर फसवले असेल तर घेणाऱ्याने गुन्हा दाखल करावा.

मा. सभापती : मालकी हक्क नसताना ताबेदार म्हणून ज्यांनी विक्री केले त्यांचेवर ॲक्शन घ्यावी. आदग्रस्तांना तात्पुरत्या स्वरूपात शाळेत स्थलांतर करून घ्यावे. ज्यांनी फसवणूक केली त्यांचेवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता आहे.

श्री. रविकांत गवळी : दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा सर्व्हे कधी पूर्ण होणार. माझ्या वॉर्डात १६५०० फॉर्म वाटप झाले व १९५०० चा सर्व्हे झाला. वानखेडेनगर भागात २० बाय ३० च्या प्लॉटला १२०००/- रूपये टॅक्स लावण्यात आला.

मा. आयुक्त : मालमत्ता कर थकबाकी संदर्भात निर्णय घेण्यासाठी मिळकतधारकाने प्रथम ५०% भरायचे नंतर पुढच्या शुक्रवारी त्यांना सुनावणी देण्यात येवून प्रकरण निकाली काढण्यात येईल.

श्री. रविकांत गवळी : माझ्या वार्डात एक मजूर सफाई साठी नाही. कर्मचारी देणार की नाही ५ महिन्यापासून मागणी करीत आहे.

मा.सभापती : या बाबत उपआयुक्त (प्रशासन) यांनी दखल घ्यावी सफाईसाठी त्या वार्डात मजूर देण्यात यावेफ तसेच उद्यापासून मा.उपआयुक्त (प्रशासन) व मी स्वत: प्रत्येक वार्डात साफसफाईच्या बाबतीत भेट देणार आहे. या बाबत अगोदर सर्व स.सदस्यांना सुचना देण्यात येतील. संपूर्ण वार्डात भेटी देण्यासाठी १५ दिवस लागतील.

श्री. रविकांत गवळी : वार्ड क्र क मध्ये १६५०० फॉर्म दारिद्रय रेषेचे वाटप केले आणि १९५०० चा सर्वे झाला असे नमूद केले हे बरोबर आहे का?

श्री.नासेर नहदी : महानगरपालिकेच्या मंजूर लेआऊटमधील ओपनस्पेस सध्या अस्तित्वात नाही या सर्व जगावर अतिक्रमण झालेले आहे. त्याची यादी माझ्याकडे आहे.

मा.सभापती : यादीची प्रत मा.आयुक्त तसेच मला देण्यात यावी. मा.आयुक्तांनी याची चौकशी करावी.

मा.आयुक्त : आज ५.०० वाजता मा.जिल्हाधिकारी यांचेकडे बैठक आहे. जवळपास ४००-४५० ओपनस्पेस आहेत. त्या महानगरालिकेच्या नांवे करण्या संदर्भात मागणी करणार आहोत.

श्री.नासेर नहदी : ले-आऊट मंजूर केले होते त्या बाजूला ओपनस्पेस म्हणून काही जगा होत्या त्या आजअस्तित्वात नाही. त्या जगेवर हॉल , शाळा, उदयान, व्यापारी संकूल झालेले

आहे त्यात बन्सीलानगर, न्यूसमर्थनगर,समर्थनगर, पुष्पनगरी, उदयकॉलनी, खडकेश्वर, राजेशवरी कॉलनी, जयश्री कॉलनी,पन्नालाल नगर,जयनगर, दशमेशनगर, श्रेयनगर,जवाहर कॉलनी , संत एकनाथनगर आकाशवाणी जलना रोड, शिवशक्ती कॉलनी जलना रोड, महेशनगर, सुराणा नगर, सेव्हनहिल जलना रोड ई. ठिकाणी ओपन स्पेस सोडलेले होते ते आजअस्तित्वात नाही.

मा.आयुक्त :महानगरपालिकेकडे ३६५ ओपनस्पेस आहेत त्यापैकी १३९ महानगरपालिकेच्या नावावर आहेत उर्वरीत नाही. त्या नांवावर करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी करणार आहोत.

श्री.अजीजजागीरदार : क्रांतीचौक भागात महानगरपालिकेची भारत अॅटो मागे लिजवर जगा दिलेली आहे. लीज ची मुदत संपून ५० वर्ष झालेले असतांना महानगरपालिकेने जगा ताब्यात का घेतलेली नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : स.सदस्य पोटतिडकिने आपल्या भावना व्यक्त करतात. त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष करणे योग्य नाही महानगरपालिकेची जगा आहे ती ताब्यात घेणे प्रशासनाने काम आहे. तसेच शहागंज येथील पेट्रोल पंपची जगा लीजवर दिलेली असून त्यांचेकडून महिन्याला २४५ रूपये नाममात्र भाडे वसूल करण्यात येते. आज ती जगा लाखो रूपयांची आहे. तेथील जगा ताब्यात घेतल्यास महानगरपालिकेला विकास करता येईल.

मा.आयुक्त : या संदर्भात चौकशी करण्यात येईल, योग्य तो मार्ग काढला जईल व नियुमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री विनायक पांडे : शहागंजयेथील पेट्रोल पंपासाठी जगा लिजवर दिलेली असून फक्त २४५ रूपये भाडे वसूल केले जते.

मा. सभापती : संपूर्ण जगेचा तपशील सभागृहात ठेवून मा. आयुक्तांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : भाडेपट्ट्यासंबंधी माहिती घेतली. ९९ वर्षाचा भाडेपट्टा केलेला आहे. त्यात भाडेवाढीची तरतुद केलेली नाही.

मा. सभापती : ९९ वर्षानंतर त्यांची मालकी राहात नाही.

उप आयुक्त (म) : महानगरपालिकेच्या मालकीच्या ५१ जगा वेगवेगळ्या संस्थांना, व्यक्तींना भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. शहागंज येथील पेट्रोल पंपची जगा १९३० साली दिलेली असून २०२९ मध्ये भाडेपट्ट्याची मुदत संपेल. मालमत्ता विभागाने अभ्यास केला. लिज अॅक्ट प्रमाणे एकतर्फी भाडेवाढ करता येत नाही. जगा वेगवेगळ्या ठरावाद्वारे दिलेल्या असतील. भाडेपट्टा करारनामा नाही. ज्या जगा प्रशासकीय आदेशाने दिल्या ते घेता येईल का याची तपासणी करण्यात येईल.

मा. सभापती : नियमान्वये कायदेशीर कार्यवाही करावी.

श्री.रविकांत गवळी : आग विझविताना अग्नीशमन दलाचे चार कर्मचारी जखमी झाले. महानगरपालिकेकडे आवश्यक ती साधनसामुग्री आहे किंवा नाही?

मा. सभापती : साधानसामुग्री नाही. उप आयुक्त महसुल यांनी प्रस्ताव ठेवावा.

**<u>विषय क्र. ७८ :</u>**

दिनांक २७/९/२००५ (का.प.क्र.१०) व ४/१०/२००५ (का.प.क्र.११) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : गारखेडा येथील मोबदल्याच्या संदर्भात असलेल्या ठरावामध्ये मा.सभापती यांनी अटी व शर्ती टाकल्या. मा. आयुक्तांनी कार्यवाही केली त्याबद्दल अभिनंदन. लोकांवर कारवाई करून थांबता येत नाही. सहाय्यक संचालक नगर रचना यांचेवर जबाबदारी आहे. त्यांना परत पाठवा. दि.२१-५-१९९९ अश्वीनी ट्रेडींग कंपनी यांना बांधकाम परवानगी दिली. दि.३०/३/२००१ रोजी सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली. बां.प.आदेशातील अट क्र.२१ प्रमाणे बाधीत क्षेत्राचे चटई क्षेत्र मोबदला दिलेला आहे. २००३ मध्ये सुधारीत बांधकाम परवानगी झाली. दि.८-७-२००३ ला सहा.संचालक नगर रचना यांनी संबंधीत कनिष्ठ अभियंता यांना 'मूळ संचिका दाखवा' असा शेरा दिलेला आहे. या जगेचा मोबदला चटई क्षेत्र निर्देशांकाच्या स्वरूपात दिल्याची त्यांना जणीव होती. स्थायी समितीमध्ये आणण्याचा उद्देश काय?

श्री.शशांक विसपुते : सहाय्यक संचालक नगर रचना श्री.राठोड साहेब यांना पूर्ण माहिती होती. मी आयुक्तांना भेटलो होतो. त्यांनी परत एक वेळेस मालमत्ता विभाग व लेखा विभागाला मोबदला देण्याबाबत विचारणा करावी अशा सूचना दिल्या होत्या. अनेक विभाग गुंतलेले आहेत. नाथ प्रांगण येथे अतिक्रमण झालेले आहे. ज्या ठिकाणी कुंपण भिंत होती तेथे प्लॉट विक्री केलेली आहे. वकीलाने जगेला कंपाऊंड केलेले आहे. जगा महापालिकेच्या ताब्यात आहे असे पत्र द्या असे सांगितले. आपण का पत्र देत नाही. चार पाच दिवस लागले. मालमत्ता अधिकाऱ्याला पंधरा दिवस लागले. एवढे मोठ्या प्रकरणात अभिप्राय मात्र एका दिवसात अभिप्राय दिला. करारनामा नोंदणीकृत झालेला आहे. मालमत्तेची नोंद झालेली नाही का? तीन हजराचे काम असेल तर चार ठिकाणी संचिका फिरते. या प्रकरणात एकच विभाग आणि एकच अधिकारी गुंतलेले नाहीत. पूर्णपणे पुर्वनियोजनानुसार झालेले आहे. अशी कामे करण्याची त्यांना सवय झालेली असते. किती प्रकरणे झाली आहेत? अर्थसंकल्पात तरतुद नाही. बजेट मिळत नाही. गुंठेवारीमध्ये कामे होत नाहीत. खुल्या जगेत अतिक्रमण, कुंपण भिंत झालेली आहे. पाणी पुरवठा ड्रेनेज साठी निधी नाही. एवढे मोठे प्रकरण १.२९ कोटीचे सहजसहजीचे नाही. दुष्ट प्रवृत्तीचे लोकांची कामे आहेत. या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे सचिवांचे पत्र आलेले आहे. खुलासा करावा.

श्री.विनायक पांडे : मा. सभापती आपले अभिनंदन. आपण अटी-शर्ती टाकल्या नसत्या तर स्थायी समितीला बुमरँग करण्याचा प्रयत्न झाला होता. प्रशासनाला २००३ ची माहिती आहे. सहा.संचालक नगर रचना दोषी तर त्यांना परत पाठवावे,त्याला पर्याय नाही.

श्री.अजिजजहागिरदार :दि.२७-९-२००५ रोजी हा ठराव झालेला आहे. यापुर्वी कुणाला मोबदला दिला आहे का, मालकी हक्काची खात्री करून घ्यावी. यावरून ठरावाला मंजुरी दिल्याचे दिसत नाही. तसेच लेखा विभागाने तपासणी करावी याचा उल्लेख दिसत नाही. महाराष्ट्र शासनाचे दि.१६.९.२००५ चे पत्र आहे. पत्र चौकशीचे आहे. शासन पत्र क्र.मनपा/१००५/नवि-२४ दि.१८.८.२००५ शासनाने पाठवले आहे. याची महानगरपालिकेत आवक क्र.९२३ दि.१६.९.२००५ प्रमाणे नोंद आहे. हे पत्र खाजगी वाटाघाटीने भूसंपादनातील भ्रष्टाचार रोखणे बाबतचे असून

मा.आयुक्त यांनी सहाय्यक संचालक नगर रचना यांना मार्क केलेले आहे. असे असतांना २७ च्या सभेत हा ठराव कसा येतो? शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केलेले आहे.

श्री.दिलीप गायकवाड : हा ठराव स्थायी समितीपुढे कसा आला त्याची चौकशी करावी.

श्री.अजिजजहागिरदार : शासनाचे एक परिपत्रक आहे. मुल्यांकनासाठी मर्यादा नमूद केलेल्या आहेत. जमीन मुल्यांकन मर्यादानुसार सहाय्यक संचालक नगर रचना ह्यांना ४० लाखापर्यंत, उप संचालक नगर रचना यांना ८० लाख त्यानंतर संचालक नगर रचना यांचेकडे जते. आपले सहाय्यक संचालक नगर रचना हे १.२९ कोटीचे मुल्यांकन करू शकतात का? २००१ मध्ये चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात आले. जेपर्यंत विकास योजना रस्ता होत नाही तोपर्यंत वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देता येत नाही. चटईक्षेत्र निर्देशांक २००१ ला दिले व २००२ मध्ये विकास योजना मंजूर झाली. विकास योजनेमध्ये हा रस्ता राहील यास अधीन राहून चटईक्षेत्राच्या स्वरूपात मोबदला दिलेला आहे. त्यावर श्री.राठोड साहेबांची सही आहे. दि.२७ च्या सभेमध्ये मी बोललो होतो. जहीर प्रगटनावर श्री.आर.पी.नाथ यांचे नांव आहे मात्र ठरावात आर.पी.नाथ यांचे नांव नाही. त्यांचा आपसात काहीतरी करारनामा झाला आहे. परंतु महानगरपालिकेसह झालेला नाही. २५% रक्कम यांना द्या, २५% रक्कम त्यांना असे वाटून देण्याचा अधिकार आपणांस आहे का? आणखी तीन जहीर प्रगटन झालेली आहेत. त्यास मा.आयुक्तांची संमती घेतलेली नाही. मी १३२९ फसलीचा नकाशा दाखवलेला आहे. १९१० मध्ये रस्ता होता. लिमिटेशन ॲक्टनुसार कलम २५, २६, २७ नुसार जर अखंडीत ताबा असेल तर मूळ मालकाचा हक्क राहात नाही. १९१० मध्ये झालेला असल्याने आपल्याला ताब्यात घेण्याचा प्रश्नच येत नाही. चौकशी झाली पाहिजे,अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करावे.

श्री.नासेर नाहदी : गुन्हेगारालाच माफीचा साक्षीदार करण्यात आलेले आहे. पूर्ण चौकशी करावी. कठोरात कठोर शिक्षा द्यावी, बडतर्फ करावे.यात श्री.राठोड सुध्दा जबाबदार आहेत.

श्री.रविकांत गवळी : २७ तारखेला या प्रस्तावाला मंजुरी मिळाली.सर्वांना माहिती आहे. प्लॉट धारकाची मागणी रास्त आहे. २४ मीटर रस्त्याचा मोबदला दिला आहे का, दिला तर केंव्हा दिला, पैसे कोणत्या रस्त्याचे व कोणी दिले? सदर प्रस्ताव कसा आणला? गुन्हेगार कोण चौकशी करावी.

सौ. लता दलाल : मागच्या सभेत मंजूर करण्यात आला, मा.आयुक्त नव्हते. उप आयुक्त (म) बोलले सदर ठराव मंजूर करू नये. प्रशासनाकडचा प्रस्ताव आपण मंजूर केला. ज्या जगेच्या भानगडीबद्दल १९९९ पासून ते २०००, २००१-२००३ ला बागडीया यांचा निकाल, मनपाने चटईक्षेत्र वाढवून दिले. हेच या विभागाचे विभाग प्रमुख होते. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी हा प्रस्ताव मांडला. दुय्यम आवेक्षकाकडून विभाग प्रमुखाकडे व विभाग प्रमुखाकडून मा.आयुक्ताकडे आले का. मा.आयुक्तांकडे हा प्रस्ताव आला होता का? सरळ स्थायी समितीपुढे कसा आला. मा.आयुक्तांची दिशाभूल झालेली दिसते. काल परवाच काही बदल्या झालेल्या आहेत. त्याचे निश्चित कारण काय? त्यांचा या प्रकरणाशी संबंध जेडला असेल तर चोर सोडून सन्याशाला फाशी देण्यासारखे होईल.

श्री.अजिजजहागिरदार : सदर प्रकरणात सहा.संचालक नगर रचना हे तक्रारदार आहेत. ते येथून बदलीवर गेल्यानंतर साक्षीपुराव्यासाठी येथे येतील. ते तक्रारदार असल्यामुळे तेव्हा ते तक्रार मागे घेतील.

मा. आयुक्त : महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय तसे करता येणार नाही.

श्री.अजिजजहागिरदार : त्यांना सहआरोपी करावे. बदलून गेल्यावर काय अंकुश राहिल.

श्री.मीलींद दाभाडे : बाजर वसुलीच्या संदर्भात ठेकेदाराकडून पैसे वसुली बाबत अधिकाऱ्यांच्या चुका झाल्या त्यावेळेस मात्र प्रशासनाने मोठी तत्परता दाखवली. सदर प्रकरणात अधिकाऱ्यांच्या चुका ठळक दिसून येतात. तरी बचाव करण्यात येतो. जणीवपूर्वक नसला तरी झालेला आहे. श्री.राठोड साहेब यांना सहआरोपी करावे. त्यांना का पाठीशी घालण्यात येते? सहआरोपी करण्यात आलेले नसेल तर आजच्या आज सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल करावा. नंतर जेवढे सहकारी असतील त्यांची चौकशी करावी. नसता याबद्दल आंदोलन छेडण्यात येईल.

श्री.दिलीप गायकवाड : यात मुख्य आरोपी कोण? एकटे राठोड साहेबांना सहआरोपी न करता २० वर्षापासून असे अधिकारी आहेत ज्यांनी त्यांना दिशा दाखवलेली असेल, त्यांच्यावरही कारवाई व्हावी.

मा. आयुक्त : माझ्याकडे संचिका आली, खाजगी तडजेडीने जगा घेण्याबद्दलचे प्रकरण होते. त्या संचिकेत जिल्हा परिषदचे पत्र होते. त्या ठिकाणी ३० फुट रस्ता आहे. ८० फुट विकास योजना रस्ता व ५० फुट विकास योजना रस्त्यासाठी जगा घेणे संदर्भात टिप्पणी सादर झाली. कोणत्याही खाजगी तडजेडीने जगा घेण्याच्या संदर्भात जहिर प्रगटन काढण्यात यावे. आम्हाला २५% - ५०% करण्याचा अधिकार नाही. भूसंपादन कायद्याखाली दोन-तीन वेळा विविध स्तरावर अधिसूचना काढण्यात येतात. भूसंपादन कायद्याखाली जहीर सूचना काढण्यात येतात. या प्रकरणात जहीर प्रगटन काढल्यानंतर एकही हरकत आलेली नाही. त्या संचिकेवर मी सही केल्यानंतर दोन स.सदस्य माझ्याकडे आले व त्यांनी सांगितले की, सदर प्रकरणामध्ये सखोल बघण्यात यावे. त्यानंतर लगेचच मी संचिका परत मागविली. पुन्हा एक दिवसानंतर ते परत आले व परत पाठवावे म्हणून सूचना केली. त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. सदर प्रकरण स्थायी समिती सभेपुढे पाठविण्यापुर्वी सदर जगेचा मोबदला देण्यात आला नसल्याचे लेखा विभाग व मालमत्ता विभागाकडून खात्री करून घ्यावी, अशा सूचना संचिकेमध्ये देण्यात आलेल्या आहेत. नंतर संचिका स्थायी समितीपुढे सादर झाल्याचे मी कोलंबोच्या दौऱ्यावर असतांना मला फोन आला. त्यानंतर मी उप आयुक्त (म) श्री.आनंदकर यांना दूरध्वनीवरून सूचना दिल्या की स्थायी समिती सभेपुढे सदर प्रस्ताव चुकीने आला आहे असे स्टेटमेंट करावे व प्रस्ताव मंजूर करू नये अशी विनंती करावी. या वेळेपर्यंत मला या प्रकरणामध्ये घोटाळा आहे याची माहिती नव्हती. तसेच सहाय्यक संचालक नगर रचना यांनाही सूचना केल्या होत्या की, स्थायी समितीमध्ये स्टेटमेंट करावे की, सदर प्रस्ताव चुकीने आलेला आहे व त्या संदर्भात माफी मागण्यात यावी. सदर प्रकरणात चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आले याची माहिती मिळाली. ९ एकर १८ गुंठे जगेचे २००१ ला परवानगी देण्यात आली होती. चटई क्षेत्र निर्देशांक वापरलेल्या जगा बिल्डरची आहे याची खात्री करणे याबाबत मा.दिवाणी न्यायालयाकडे दावा दाखल करण्यात आला होता.

त्यात बिल्डरसह प्रतिवादी नं.१ आर.पी.नाथ होते. त्यांनी आपसात करारनामा करून प्रकरण परत घेतले व त्यात असे नमूद केले की, ९ एकर १८ गुंठेचा कधीही मोबदला मागणार नाही. फसवणूकीचा प्रयत्न कुणी केला आहे हे शोधावे लागेल. दोन, तीन लोकांनी पैसे घेण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात खोलवर गेल्यानंतर असे निदेर्शनास आले की, चटईक्षेत्र निर्देशांक २००१ मध्ये देण्यात आला. १ जुलै पुर्वी २००३ मध्ये सुधारीत मान्यता देण्यात आली. त्यावेळेस दुसरे अधिकारी होते. ८ जुलै रोजी सध्याचे सहा.संचालक नगर रचना यांनी संचिका पाहिली. २००४ मध्ये श्री.नाथ व इतर यांनी आपसात करारनामा करून प्रस्तावाप्रमाणे वाटप करण्यासंदर्भात आमच्याकडे संचिका सादर झाली. सदर प्रकरणात कुणीतरी दुसऱ्यांदा मोबदला घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मालकांची मागणी ही कागदावरच आहे. आमची फसवणूक होत असल्याचे वाटले त्यामुळे अर्जदाराविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

श्री.अजिजजहागिरदार : मा. आयुक्त साहेबांना या प्रकरणात आमदारांचा फोन आला होता ते आमदार कोण आहेत?

श्री.रेणुकादास वैद्य : २००३ मध्ये परवानगी देण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त : फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल केल्यानंतर डॉ.नाथ यांचे पत्र आले. त्यांनी हे सर्व प्रशासनाने प्रसिध्दीसाठी केले, त्यात प्रतिवादी ५ आणि ६ व दावेदार यांच्यात तडजेड केली. त्या प्रकरणातही प्रतिवादी नं.१ श्री. नाथ होते. त्यांना सुनावणीला बोलावले आहे. असेही होऊ शकते की, त्यांना काही माहिती नसेल. पोलीसांची जबाबदारी आहे. मोबदल्याची मागणी एका व्यक्तीची नसून ग्रुपची आहे. त्यांचे नांव करारनाम्यामध्ये होते. फसवण्याचा प्रयत्न केला म्हणून आपण गुन्हे दाखल करतो. पोलीस म्हणत नाही की ते गुन्हेगार आहेत. तपासात सगळे निघतील. जे समोर आहे आणि जेसमोर नाही ते सर्व पाहण्यात येईल. पोलीसात प्रकरण दाखल करून योग्य काम केलेले आहे. संबंधीत विभाग प्रमुखाकडून गुन्हे दाखल करून घेतो. स्थायी समिती, पालिका आयुक्त व मनपा प्रशासनाची फसवणूक संदर्भात चौकशी करण्यात येईल. चौकशीत कोण दोषी निघेल ते माहित नाही. कोणासही पाठीशी घालणार नाही. खरोखरच गुंड प्रवृत्तीचे लोक आहेत. ज्यांच्यावर दडपण आणले गेले व मोबदला उचलण्याचा प्रयत्न केला ते पण चौकशीत समोर येईल. प्रशासन गप्प बसलेले नाही. सध्याचे सहा.संचालक नगर रचना यांनी सदर संचिका ८ जुलै २००३ रोजी बघितली होती. ते आठवणीत नसेल.

श्री.मुजीब खान : सध्याचे सहाय्यक संचालक नगर रचना यांनी स्वाक्षरी करून दिलेली आहे.

मा. आयुक्त : शासनाचे पत्र १६ तारखेला आले. नियमित कामकाजप्रमाणे ते विभाग प्रमुखाला मार्क केले. ते पत्र जवक नोंदणीनंतर संचिकेबरोबर यायला पाहिजेहोते.

श्री.रेणुकादास वैद्य : श्री.राठोड साहेब यांना आरोपी करावे.

मा. आयुक्त : शासनाचे जे पत्र आहे ते अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. त्यांनी अहवाल मागवलेला आहे. दुसरे असे की, पोलीसात गुन्हा दाखल करण्यापुर्वी पुरावा लागतो. सदर प्रकरणात अंतर्गत चौकशी करण्यात येणार आहे. अशा प्रकारचे पुन्हा कुणी धाडस करायला नको. कृपा करून कोणाचेही कोणत्याही दबावाला बळी पडू नका.

श्री.शशांक विसपुते : सदर प्रकरण संघटीत गुन्हेगारी स्वरूपाचे आहे. सखोल अभ्यास करून कारवाई करावी.

मा. आयुक्त : संबंधीत विभागातील बदल्या करण्यात आल्या. नगर रचना विभागाच पूर्ण दोषी आहे असे म्हणत नाही. पुर्वी काही एक दोन प्रकरणे होती. कर्मचारी पाच-सात वर्षापासून तेथे होते. सदर प्रकरणात नॉन प्लेईंग कॅप्टन जे कोणी असेल त्यालाही शोधावे लागेल.

श्री.अज्जिजहागिरदार : भूसंपादन अधिकाऱ्यांनी ५०-६० निवाडे जहीर केलेले आहेत, त्यांना मोबदला देत नाही. खाजगी वाटाघाटी करण्यात येतात. मा.उच्च न्यायालयात प्रकरणे चालू असतात त्यांना १८% व्याज द्यावे लागते. बरेच निवाडे जहीर झालेले आहेत. मागच्या वर्षी पन्नालालनगर येथे ९० लाख रूपये ललित वकील यांना देण्यात आले.

श्री.रेणुकादास वैद्य : एक कडी पकडा सर्व मिळतील. राठोड साहेबांवर गुन्हा दाखल करा.

श्री.मिलींद दाभाडे : राठोड साहेबांची तक्रार द्यावी. पी.सी.आर.काढल्यानंतर सर्व काही सांगतील.

मा. आयुक्त : माझी चौकशी चालू आहे. या चौकशीमध्ये जे कोणी जबाबदार निघेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.दिलीप गायकवाड : सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावी.

मा. सभापती : दिनांक २७/९/२००५ रोजीच्या स्थायी समिती सभेचा वृत्तांत कायम करण्यासाठी आलेले आहे. पान क्र.३२-३३ वर गारखेडा येथील स.नं.५३ येथील भूसंपादना संबंधीचे असून महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला होता. सर्वांनी आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. प्रस्ताव कसा याची पार्श्वभूमी व या संदर्भातील काही माहिती मा.आयुक्तांनी सभागृहापुढे ठेवली. ज्या वेळेस प्रस्ताव सादर झाला होता त्यावेळी यापुर्वी मोबदला दिला आहे का, हा मुद्दा उपस्थित झाला होता. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत हा छोटा-मोठा रस्ता वापरात होता अशा सूचना आल्या. सदर प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने सादर झालेला असल्याने सभागृहातील आलेल्या सूचना व सर्वांचे मत ऐकून सदर प्रस्तावातील त्रृट्या निदर्शनास आणून काही अटी-शर्ती टाकून सभागृहाच्या सहमतीने मंजूरी दिली होती. जिल्हा परिषदेच्या रस्त्यासंबंधी व मोबदल्याच्या बाबतीत सूचना दिल्या होत्या.

श्री.अज्जिजहागिरदार
श्री.मुजेब खान : तेव्हा आम्ही विरोध केला होता. आमची सहमती नव्हती.

श्री.कंवरसिंग बैनाडे : हा विषय मंजूरीला आला नसता तर हे प्रकरण उघडकीस आले नसते.

मा. सभापती : या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली होती व आताही चर्चा होत आहे. वर्तमानपत्रातून सर्व बाबी उघडकीस आलेल्या आहेत. आपण आमचा विरोध नोंदवा असे म्हणाले नव्हते.

श्री.मुजेब खान : सदर प्रकरणात मी यापुर्वी मोबदला देण्यात आल्याची सूचना केली होती.

मा. सभापती : सदर प्रकरणात असलेल्या त्रृट्यांची संपूर्ण माहिती मागविण्यात आली. लेखा विभागाने तपासणी करावी असे ठरावात नमूद केलेले आहे, वैधानिक कार्यवाही करावी असे म्हटले नाही. आताही चर्चा झाली. या शहरात मालकी हक्काबाबत हैद्राबादपासून चौकशी करावी लागेल. सदर प्रकरण १९९९ मध्ये सुरूवात झाली असून २००० ला मोबदल्याच्या स्वरूपात चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात आले. सदर

संचिकेवर वेगवेगळ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या दहा सह्या आहेत. चार उप संचालक/सहाय्यक संचालक नगर रचना यांच्या सह्या आणि तेवढेच चार आयुक्तांच्या सह्या आहेत. हे सर्व होत असतांना स्थायी समितीपुढे प्रस्ताव आला. सर्व कार्यकारी अभियंता पासून इतर अधिकारी सभागृहात हजर होते. दु:ख याचे वाटते की, एकाही अधिकाऱ्याला जणवले नाही की आपल्या सह्या आहे, एफ.एस.आय.दिले आहे. त्यांना याची जणीव झाली नाही का? या संस्थेशी बांधीलकी असावी असे वाटले नाही का? याची शहानिशा व्हावी. संपूर्ण प्रकरणाचा आणि गेल्या १० वर्षापासून खाजगी वाटाघाटी होत आहेत त्या थांबविल्या पाहिजे. भूसंपादन अधिनियम १८९४ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये जिल्हाधिकारी मार्फत भूसंपादन करावे व सर्व प्रकरणे निकाली काढावीत. जधववाडी, पडेगांव भागातील रस्त्यांचे भूसंपादन करण्यासाठी अनेक वेळा सांगण्यात आले. जधववाडी येथील रस्त्याच्या बाबत त्यावेळचे सभापती यांनी दोन महिन्यात कार्यवाही करावी असे आदेशित केले होते. परंतु आपले कर्तव्यदक्ष अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही. ज्यावेळेस आपण अडचणीत असतो त्यावेळेस फक्त कायदाच आपल्या सोबत असतो. सन १९९५ पासून खाजगी वाटाघाटीने भूसंपादन झालेल्या प्रकरणाची तपासणी मुख्य लेखा परीक्षक श्री.औताडे यांनी करावी. ही सर्व प्रकरणे त्यांना उपलब्ध करून देण्याबाबत मा.आयुक्त यांना सूचना देण्यात येत आहे. एक महिन्यात स्थायी समितीपुढे अहवाल सादर करावा. कुणी आठ-दहा दिवस सुटीवर असेल तरी काम पूर्ण व्हावे. याबाबत चौकशी करण्यासाठी निर्णय देण्यात येत आहे. चौकशीत सर्व बाबी स्पष्ट होतील. मुख्य लेखा परीक्षक श्री.औताडे यांची सविस्तर टिप्पणी नगर सचिव मार्फत येईल. अशा सर्व संचिकेची तपासणी संपूर्ण जबाबदारीने करावी. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.६६(१२) प्रमाणे मान्य झालेला आपला ठराव सदस्यांच्या बहुमताने ठराव करून रद्द करता येतो. या संदर्भात प्रशासनाचा ऐनवेळेचा ठराव घेऊन सभागृहाची सर्वानुमते मान्यता घेऊन रद्द करण्यात येईल.

श्री.मुजीब खान : श्री.राठोड साहेब यांना तक्रारदार करून त्यांना वाचविण्यात आले. उप आयुक्तांमार्फत तक्रार दाखल करावी.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना यांचेवर कारवाई झाली पाहिजे अशी सर्वांची भावना आहे. चौकशीची सुरूवात त्यांच्यापासूनच करण्यात येईल. जेसत्य आहे ते समोर येईल. स.सदस्यांच्या भावना आहे ते आपणास नियमानुसारच करावे लागेल. ते शासकीय आस्थापनेवर असल्याने सर्वसाधारण सभेमध्ये या संदर्भात निर्णय घ्यावा लागेल.

श्री. रविकांत गवळी : अनाधिकृत वसाहती अंतर्गत सर्वेक्षणाची कामे चालू आहेत. कोणकोणत्या एजन्सीला कोणती कामे दिलेली आहेत? त्याची माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : सर्व १०३ पालिका सदस्यांना याची लेखी स्वरूपात माहिती द्यावी. सदर एजन्सी काम करते किंवा नाही हे सदस्यांच्या लक्षात येईल.

कर निर्धारक व संकलक : तापडीया नाट्यगृहाचा स्पेक इंडीया लि.मार्फत सर्व्हे केलेला आहे. पूर्ण क्षेत्र १४५१ चौ.मी. असून बांधकाम 'अ' वर्ग मध्ये मोडते. त्यास २,५१,६८३/- सदर ऑडीटोरीयमची कर आकारणी उपलब्ध असलेल्या

सीटवर अवलंबून असते. किती दिवस वापरण्यात येते त्याप्रमाणे कर आकारणी होते. पुर्वी कर आकारणी केलेली नाही.

मा. आयुक्त : जुलै महिन्यात स्पेक कंपनीने सर्वे केला त्यानुसार त्यांचेकडे असलेली रक्कम वसुल करण्यात येईल.

सौ. लता दलाल : २ लाख ४९ ची नोटीस देणार. जेव्हापासून नाट्यगृह वापरात आहे तेव्हापासून कर आकारण्यात यावा. कर आकारणीबद्दल का दखल घेतली नाही? त्या ठिकाणी वेगवेगळे प्रदर्शन भरतात त्याचाही उल्लेख केलेला नाही.

मा. आयुक्त : आपण मागील सात-आठ वर्षापासून सर्व्हे केलेला नाही.

सौ. लता दलाल : तापडीया नाट्यगृह हे नजरेआड होऊ शकत नाही. त्यांनी परवानगी घेतली का, महानगरपालिकेने कर आकारणी केली आहे किंवा नाही, त्या वास्तुला आपण नाट्यगृह म्हणून मान्यता देत आहोत का? हे तपासणे आवश्यक होते.

मा. सभापती : नियमानुसार कार्यवाही व्हावी. महानगरपालिकेच्या हिताचे रक्षण करावे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : कार्यक्रमाची परवानगी पोलीस आयुक्तांकडून देण्यात येते. पोलीस आयुक्तांना या संदर्भात पत्र दिले तर ते कार्यक्रमाची परवानगी देणार नाही.

मा. सभापती : महानगरपालिकेमध्ये मालमत्ता कराच्या संदर्भात स्पेक इंडिया लि. यांच्या माध्यमातून १ लाख ४२ हजर मालमत्तांचा शोध घेण्यात आला ज्यांना अद्याप पर्यंत मालमत्ता कर लागलेला नव्हता. या संदर्भात जलद गतीने काम करण्यात यावे. किमान पुढील आर्थिक वर्षात तरी मालमत्ता करात वाढ होईल. वाढीव ७० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. किमान २४-२५ कोटीची भर होईल. कर्मचारी कमी पडत असतील तर उपलब्ध करून द्या. १५ दिवसात नोटीसा मिळतील अशी कार्यवाही करण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

दिनांक २७/९/२००५ (का.प.क्र.१०) व ४/१०/२००५ (का.प.क्र.११) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**<u>विषय क्र. ७९ :</u>**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका मालखरे क्लासीक, गारखेडा व्यापारी संकुलातील दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना ज.क्र.मनपा/मामअ/२२/२००५ दिनांक ६.१.२००५ अन्वये वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या होतया. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१. श्री.दत्तात्रय एकनाथ खामगांवकर, दुकान क्र.६ करीता रू.२०७/- प्रती माह प्रति चौ.मी. असा दर दिला आहे.
२. श्री.महंमद नजीर महंमद बशीर यांनी दुकान क्र.६ करीता निविदा भरलेली आहे. परंतु दर दिलेले नाही.

सदरील दुकानासाठी आधारभूत रक्कम रू.१५०/- असे कार्यालयाने दर ठरविले होते. प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये जस्तीचे दर श्री.दत्तात्रय एकनाथ खामगांवकर यांनी रू.२०७/- प्रती माह प्रती चौ.मी. असा दर दिला आहे. तरी निविदा धारकाने दिलेला जस्तीच्या दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अजिजजहागिरदार : दुसरे दुकानांच्या संदर्भात लिलाव करताना जे जस्त अनामत रक्कम देईल त्यांना देण्यात येते. या प्रकरणात हे नियम का लागू केले नाही ?

मा. सभापती : दिनांक ६-१-२००५ च्या वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यात अनामत रक्कम दाखवणे गरजेचे होते. मनपाच्या दुकानांकरीता योग्य प्रतिसाद मिळत नाही. अनामत रक्कम संबंधी मालमत्ता अधिकारी यांनी यापुढे कार्यवाही करावी.

मालमत्ता अधिकारी : दि.६-१-२००५ ला दोन निविदा काढण्यात आल्या. १.श्री.दत्तात्रय एकनाथ खामगांवकर यांची व दुसरी श्री.महंमद.नजीर यांची दुकान क्र.६ करीता निविदा भरलेली होती. परंतु त्यांनी दर दिलेला नाही. आली आधारभूत किंमत १५० रू.प्रती चौ.मी. होती. आधारभूत किंमतीपेक्षा जस्त दर दिलेला आहे. व रू.१०,०००/- अनामत रक्कम आहे.

मा. आयुक्त : मासिक दरावरूनच अनामत रक्कम काढतात.

मा. सभापती : सदर प्रकरणात पारदर्शकता समोर आलेली आहे. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले आहे. अनामत रक्कमेचा समावेश करावा. सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. महानगरपालिकेच्या इतर सर्व मालमत्तेच्या संदर्भात भाडेवाढ करण्याच्या बाबत स्थायी समिती व सर्वसाधारण सभेपुढे जवे लागेल. महानगरपालिकेचे जे गाळे अद्याप देण्यात आलेले नाही अशा सर्व प्रकरणात एक महिन्यात कार्यवाही उप आयुक्त (महसूल) व मालमत्ता अधिकारी यांनी पूर्ण करावी व या कालावधीत जहीर निविदा काढण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मालखरे क्लासीक, गारखेडा व्यापारी संकुलातील दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी दुकान क्र.६ करीता प्राप्त झालेली श्री.दत्तात्रय एकनाथ खामगांवकर, यांची रू.२०७/- प्रती माह प्रति चौ.मी. या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जेसी.बी. मशीन चालविण्यासाठी सध्या एक नियमित व एक दैनिक वेतनावरील वाहन चालक आहे. दैनिक वेतनावरील जेसी.बी.चालकाकडून अनेक वेळा जस्तीचे काम करून घ्यावे लागते. त्यापैकी नियमित वाहन चालकास नियमाप्रमाणे ओव्हरटाईम देता येतो. परंतु दैनिक वेतनावरील वाहन चालकास ओव्हरटाईम देता येत नाही. दैनिक वेतनावरील जेसी.बी. वाहन चालकाकडून दररोज ४ तास जस्तीचे काम करून घेतल्यास संबंधीतास रूपये ५०/- विशेष भत्ता चार तासांसाठी अदा करण्याच्या मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : नगर सचिव विभागात श्री.नवले हे लघुटंकलेखक म्हणून दैनिक वेतनावर १९९७ पासून काम करतात. त्यांना सुट्यामध्ये व कार्यालयीन वेळेनंतर देखील काम करावे लागते. ओव्हरटाईम दिला जत नाही. त्यांचाही समावेश करण्यात यावा.तसेच ते १० वर्षापासून दैनिक वेतनावर काम करतात. विशेष बाब म्हणून त्यांना सेवेत कायम करण्यात यावे.

श्री.अजिजजहागिरदार : स.पदाधिकारी यांचेकडे दैनिक वेतनावर असलेल्या कर्मचाऱ्यांना रात्री उशीरापर्यंत बसावे लागते. त्यांना देखील ओव्हरटाईम देण्यात यावा.

श्री.नासेर नाहदी : विरोधी पक्षनेता दालनावरील दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना ओव्हरटाईम देण्यात यावा.

मा. सभापती : स.सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे दैनिक वेतनावरील लघुटंकलेखक आणि पदाधिकारी यांचेकडे दैनिक वेतनावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना ओव्हरटाईम देण्याच्या दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते. तसेच एक जेसी.बी. चालक मागील साडेसात वर्षापासून दैनिक वेतनावर काम करतो. त्यांना कायम केल्या जत नाही. आयुक्तांचे स्वीय सहाय्यक श्री.मोईनोद्यीन हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या रिक्त जगेवर कोणत्यातरी लघुटंकलेखकाला पदोन्नती देऊन घेण्यात यावे. ती जगा रिकामी होईल. श्री.नवले हे मागील दहा वर्षापासून दैनिक वेतनावर लघुटंकलेखक म्हणून काम करतात. त्यांच्याकडे कोणाचे लक्ष जत नाही. जणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येते. मा.आयुक्तांनी लक्ष घालावे व कायमस्वरूपी नेमणूक द्यावी.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक वेतनावरील जेसी.बी. वाहन चालकाकडून दररोज ४ तास जस्तीचे काम करून घेतल्यास संबंधीतास रूपये ५०/- विशेष भत्ता चार तासांसाठी अदा करण्यास तसेच नगर सचिव विभागातील दैनिक वेतनावरील लघुटंकलेखक आणि स.पदाधिकारी यांचेकडे कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला देण्याच्या दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. ८१ :</u>

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्वसाधारण सभा विषय क्र. ४६/३ दि.१८.८.२००५ नूसार असे ठरले की, शहर बस वाहतूक एस.टी. महामंडळाकडून हस्तांतरीत न करता एस.टी. महामंडळाने आणखीन सहा महिने चालवावी.

मध्यंतरीच्या काळात आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद, यांनी खाजगी संस्थेकडून शहर बस वाहतूक चालविणे शक्य आहे काय ? ते तपासून पहावे व शक्य असल्यास रॉयल्टी बेसीसवर चालविण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी व वैधानिक कार्यवाही करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

त्यानूसार महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद शहरात शहर बस वाहतूक उपक्रम राबविण्यासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी राज्यस्तरीय वर्तमान पत्रात १) लोकसत्ता २) महाराष्ट्र टाईम्स् ३) टाईम्स् ऑफ़ इंडिया ४) दै. लोकमत ५) सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या. खालीलप्रमाणे अटी व शर्ती ठरविण्यात आल्या होत्या.

## <u>शहर बस वाहतूक संबंधी सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>

१) औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत "**औरंगाबाद परिवहन उपक्रम** " या नांवाने शहर बस वाहतूक चालवावी लागेल.

शहरातील २५ रूटवर अंदाजे १०० बसेस टाटा -७०९, महींद्रा ,आयशर , स्वराजमाझदा इत्यादी चासीसवर आधुनिक पध्दतीने बॉडी बनवून नवीन बसेस शासनाच्या नियमानुसार खरेदी कराव्या लागतील. त्यापैकी ५ बसेस मध्ये ए.सी . बसवून टुरिस्ट रूटवर वापरण्यात

येतील. चढण्या व उतरण्यासाठी दोन दरवाजेजेहायड्रोलीक सिस्टीमने ॲटोमॅटीक उघडणारे व बंद होणारे राहतील.

२) सर्व बसेस महानगरपालिकेच्या नांवावर खरेदी कराव्या लागतील. बस बॉडीचे डिझाईन बॉडी बिल्डर्स कडून मागवून त्यातील सर्वोत्कृष्ट डिझाईनची निवड मा. आयुक्त करतील. बसचा रंग मा. आयुक्तांच्या निर्णयाप्रमाणे द्यावा लागेल. बस खरेदीसाठी लागणारे २० % मार्जीनमनी एजन्सी ज्यांच्या नांवे बी.ओ.टी. तत्वावर १० वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राट मंजूर झाला त्यांना भरावा लागेल. ८० % रक्कमेसाठी बँकेमार्फत कर्जघ्यावे लागेल.

३) या उपक्रमासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कोणत्याही प्रकारचा खर्च केला जणार नाही. बससेवा , कर्मचाऱ्यांची नेमणूक त्यांचा पगार, भत्ते, ड्रेस इत्यादींचा खर्च एजन्सीस करावा लागेल. बससेवा कर्मचाऱ्यांचा महानगरपालिकेशी काहीही संबंध राहणार नाही. कारण ते संबंधित संस्था/फ़र्म/एजन्सी यांचे कर्मचारी असतील व त्यांना महानगरपालिकेच्या नोकरी बाबत हक्क मागता येणार नाही. तसे महानगरपालिका कार्यालयाशी नोकरीचा हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

४) संबंधित संस्था/फ़र्म/एजन्सी/कंपनी शासन परिवहन विभागाचा व इतर विभागाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. तसेच शासकिय फ़ीस/कर भरण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधिताचीच असेल.

५) परिवहन उपक्रम राबवितांना अपघातातुन उद्‌भवणारी नुकसान भरपाई देणे तसेच मदत देणे व वैद्यकिय मदत इत्यादी जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाही, ती संबंधित संस्थेची राहील.

६) बसेसवर होणारा दुरूस्ती खर्च, डिझेल/ऑईल इत्यादींचा खर्च संस्थेस करावा लागेल. त्यासाठी सुसज्ज कार्यशाळा त्यांना सुरू करावी लागेल. बसेसचा विमा काढणे अथवा विम्यांचे नुतनीकरण हा खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.

७) शासनाच्या नियमानुसार नागरिकांना/विद्यार्थ्यांना प्रवासासाठीच्या सवलती व पासेस द्यावे लागतील.

८) तिकीटाचे दर व थांबे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण व मा. विभागीय आयुक्त (महसूल) यांनी ठरवून दिल्यानुसारच आकारावे लागतील. ए.सी. बसेससाठी २०% अधिक रक्कम चार्जकरता येईल.

९) बसेसच्या रूटसाठी आर.टी.ओ. कार्यालयाकडून व राज्य परिवहन महामंडळाकडून परवानगी घ्यावी लागेल.

१०) बसेस पार्कींग करण्यासाठी , कार्यशाळा , सर्व्हीस स्टेशन, कार्यालयीन इमारतीसाठी लागणारी जगा महानगरपालिका उपलब्ध करून देईल. या जगेचा पूर्ण विकास एजन्सीस करावा लागेल. त्यावर एजन्सीस किराया लागणार नाही. परंतु त्यावर कराव्या लागणाऱ्या बांधकामाचा खर्च एजन्सीस करावा लागेल.

११) कमीत कमी १० बसेस चालवणाऱ्या व बस वाहतूक चालविण्याचा ज्या संस्था/फर्म/एजन्सीज/कंपनीस अनुभव आहे अशांनाच औरंगाबाद परिवहन उपक्रम चालविण्यास देण्यात येईल.

१२) सर्व सिटी बसेस द्वारे जेवढे किलोमीटर रनिंग होईल त्या कि.मी. रनिंगवर प्रति किलोमीटर रॉयल्टी जी संस्था/फर्म /एजन्सी जस्तीत जस्त रॉयल्टी महानगरपालिकेस देईल, त्याचे देयक मंजूर करून त्यांच्याशी १० वर्षाचा सामंजस्य करार करण्यात येईल.

१३) बस सर्व्हीसद्वारे येणारे उत्पन्न बँकेत जॅईंट अकाऊंट ( एडउठज्ञ ) उघडून रोजजमा करावे लागेल. प्रति कि.मी. प्रमाणे होणारी रॉयल्टीची रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात दर महिन्याला जमा केल्यानंतर व कर्जचे हप्ते भरल्यानंतर उरलेली रक्कम एजन्सीस अदा करण्यात येईल.

१४) ठरविलेल्या रूट व्यतिरिक्त नवीन बस रूट सुरू करावयाचे ठरल्यास त्यासाठी लागणारी परवानगी घेऊन एजन्सीस त्या रूटवर बस चालविणे बंधनकारक राहील.

१५) रूपये ५० लक्ष वार्षिक उलाढाल असल्याबाबत कागदपत्रे सादर करावी लागतील.

१६) इन्कम टॅक्स व सर्व्हिस टॅक्स क्लीयरन्स् सर्टीफ़िकेट सादर करणे बंधनकारक राहील.

१७) शहरातील बस थांब्यावर महानगरपालिकेने निर्देशित केल्याप्रमाणे डिझाईनचे निवारे बांधण्याचे काम संस्थेस करावे लागेल व तेथे लागून महानगरपालिकेने ठरविलेल्या आकाराची छोटी दुकाने बांधण्यास महानगरपालिका परवानगी देईल. जेचालविण्यासाठी मा. आयुक्त ठरवतील अशा अपंग व्यंक्तींना प्रधान्याने देण्यात येतील. त्याद्वारे येणारा किराया संस्थेस मिळेल. बस थांब्यावरील जहीरातीचे उत्पन्न संस्थेस मिळेल. या जहीरातीचे फ़क्त महानगरपालिकेचे जहिरात कर एजन्सीला भरावे लागतील. स्वच्छता व देखरेख करण्याची जबाबदारी संस्थेची राहील व छोटया दुकानांमध्ये टी स्टॉल, एस.टी.डी.-पी.सी.ओ., बुकस्टॉल इत्यादी महानगरपालिका ठरवेल अशा व्यवसायासाठी देण्यात येईल. बॉडीवर दिल्या जणाऱ्या जहिरातींचे उत्पन्न संस्थेस मिळेल. परंतू प्रत्येक बसची एक साईड केवळ महानगरपालिकेसाठी रिझर्व्ह राहील. प्रत्येक बस स्थानकाच्या जगी एक महानगरपालिकेची ठरविलेली डिझाईन प्रमाणे बिलबोर्ड ठेवण्यास परवानगी देण्यात येईल त्याचा गॄ क्षेत्र बसेसची माहिती काढणे आणि पूर्ण जहिरातीसाठी उपलब्ध राहील.

१८) प्रत्येक बसची दरवर्षी घसारा किंमत महानगरपालिकेने ठरविलेल्या व्हॉल्युअर कडून काढून जर एकूण किंमत बँकेच्या उरलेल्या लोन रक्कमेपेक्षा कमी असतील तर फ़रका एवढे फ़िक्स डिपॉझिट संस्थेस बँकेत जमा करावे लागेल. ही रक्कम मा. आयुक्तांच्या परवानगीशिवाय काढता येणार नाही. व्हॅल्युअरची फ़ीस संस्थेस अदा करावी लागेल.

१९) ज्यांचे नांवे निविदा मंजूर होईल त्यांनी निविदा मंजूरीपासुन तीन महिन्याच्या आत बसेस खरेदी करून त्या प्रत्यक्षात सुरू कराव्या लागतील.

शहर बस वाहतूकीसाठी दरपत्रक सुचना ज.क्र.मनपा/अशअ/यांत्रिकी/२१७/२००५ दि.९.९.२००५ प्रमाणे जहीर करण्यात आली. कोऱ्या निविदा विक्रीचा कालावधी दि.१२.९.०५ ते ३०.९.०५ हा होता व या काळात एकूण तीन निविदापत्रके विक्री झाली.

**१) मे. दिपक ट्रान्स्पोर्ट , पुणे.**

**२) मे. तरवडे ट्रान्स्पोर्ट, प्रा. लि. औरंगाबाद.**

**३) मे. अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित. अकोला.**

दरपत्रक भरलेल्या निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत दि.३.१०.२००५ पर्यंत फक्त एकच निविदा दर भरून प्राप्त झाली. त्यांनी भरलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| झरींळर्लीश्ररी | ठूरिश्रीं |
|---|---|
| एकूण मासिक होणाऱ्या शहर बस वाहतूकीच्या प्रवास कि.मी. वर प्रति कि.मी. रॉयल्टी किती देणार , ही रक्कम बाजूच्या रकान्यात अंकात व अक्षरात नमूद करावी. | प्रति कि.मी.<br>रनींगसाठी<br>अंकात ०.८० रूपये.<br>अक्षरी - **ऐंशी पैसे** प्रति कि.मी. |

सदरील एजन्सी यांप्रकारची शहर बस वाहतूक अकोला महानगरपालिकेत दि.४.८.२००३ पासून चालवत आहे. तसेच नुकतेच त्यांनी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतील निविदा भरली असून हे काम पण त्यांना मिळाले आहे. त्याची कार्यवाही चालू आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी त्यांनी एकूण १५० टाटा ७०९ चॅसीस च्या ३० सिटर + १२ उभे प्रवासी करणाऱ्या बसेस प्रस्तावित केल्या आहेत.

सदरील संस्थेचे रजिस्ट्रेशन क्र.३११ असून सहकारी तत्वावर ती सेवा देणार आहेत. एकूण २५ मार्गावर सकाळी ६.०० ते दुपारी २.०० ते रात्री १०.०० पर्यंत दोन पाळयांमध्ये बससेवा देणार आहेत व १० कि.मी. अंतरापर्यंत किमान भाडे प्रौढ प्रवाशांसाठी ७ रूपये व बालकांसाठी ४ रू. राहील असे म्हटले आहे.

मा. आयुक्तांनी दि.७.१०.०५ रोजी सदरील निविदेवर चर्चा करण्यासाठी व वाटाघाटीसाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविले असता त्यांचे एकूण पाच पदाधिकारी उपस्थित होते. मा. आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीत शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी व उपअभियंता यांची उपस्थिती होती. त्यामध्ये रॉयल्टी कर रू.००.८० प्रति कि.मी. खालील अटीवर मंजूर करण्यात आला.

१) सदरील संस्थेने सर्व वाहनांचा विमा वाहनांसाठी/प्रवाशांसाठी/अपघातासाठी/फुल्ली कॉम्प्रेनसिव्ह विथ थर्ड पार्टी/भुकंप/पूर इत्यादी सह उतरवावा. त्याची पूर्ण रक्कम संस्थेस अदा करावी लागेल.

२) इंधन खर्चामध्ये वाढ झाल्यास तिकिटाचे दर वाढविण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना राहील व आर.टी. ए. जे दरवाढ मंजूर करतील त्याच प्रमाणात रॉयल्टीचे दर ००.८० प्रति कि.मी. मध्ये वाढ होतील.

वरील सर्व अटी व शर्ती **मे. अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित. अकोला** यांनी मान्य केले आहे. टाटा ७०९ तसेच इतर कंपन्यांचे बॉडी बस डिझाईन/फोटोग्राफ्स् आणून दाखविण्यास संस्थेस सुचना दिली. महानगरपालिकेतर्फे बसची डिझाईन अंतिम करण्यात येईल असे ठरले. बसला हायड्रोलीक डोअर्स बसविण्याबाबत डिझाईन अंतिम करतांना निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या जगेवर स्वखर्चाने उपक्रमासाठी लागणारी इमारत, कार्यशाळा, बसथांबे व इतर सोयी संस्थेने स्वखर्चाने करण्याचे मान्य केले.

मा. स्थायी समितीच्या मंजूरीनंतर पुढील कार्यवाही करारनामा करून सुरू करण्याचे ठरले. सदरील करारनामा हा (५+५) वर्षासाठी करावा लागेल. पहिल्या पाच वर्षानंतर कराराचे नुतनीकरण करून घ्यावे लागेल. सदरील संस्थेने शहर बस सेवा प्रथम ७५ बसेस व नंतर ७५ बसेस असे दोन टप्प्यात सुरू करण्याचे मान्य केले. तसेच एस.टी. डिपार्टमेंटशी संपर्क साधून प्रस्तावित केलेले १८ मार्ग + ७ नवीन मार्ग ठरवून बस थांबे किती राहतील याची माहिती घेवून व प्रत्येक रूटवर अंदाजे किती कि.मी. रनिंग होईल याची माहिती संस्थेने सर्व्हे करून सादर करण्याचे संस्थेने मान्य केले.

तरी प्रस्तावित अटी व शर्ती व मूळ निविदेतील अटी विचारात घेऊन औरंगाबाद शहर बस वाहतूक सेवा **मे.अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित,अकोला** यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : अवैध प्रवासी वाहतुक थांबवावी.

श्री.अजिजजहागिरदार : सदर बस कोणकोणत्या मार्गावर धावणार आहे?

मा. आयुक्त : तुर्त १६-१७ रूट फायनल केलेले आहेत. टप्प्याटप्प्याने रूट व बसची संख्या वाढविण्यात येईल. शेवटी १५० बसेस असतील. रिजनल ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटी जे दर ठरवतील त्या दराने तिकीटाची आकारणी करण्यात येईल. ८० पैसे प्रति कि.मी. याप्रमाणे रॉयल्टी महानगरपालिकेला मिळेल. सदर रक्कम आपल्या खात्यात जमा होईल. बसच्या एकूण किंमतीपैकी २०% रक्कम ते टाकतील व ८०% कर्ज घेतील. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीला प्रस्ताव जईल. आर.टी.ए. दर अंतिम करूनदेतील. उद्या जर दरात वाढ झाली तर तितक्या प्रमाणात रॉयल्टीचे ८० पैसे देखील वाढतील.

मा. सभापती : सदर प्रस्तावातील तिकीटाचे दर वाढविण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील त्याऐवजी आर.टी.ए. यांना राहील अशी दुरूस्ती करण्यात येते. तसेच बस बॉडीचे डिझाईन व रंग मा.पदाधिकारी व मा.आयुक्त ठरवतील. या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेला शिफारस करण्यात येते. सदर प्रस्तावाला एकमताने पाठपुरावा केलेला आहे. सर्वांना धन्यवाद. ८ डिसेंबर रोजी महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाचा मुहूर्त साधून शहर बस वाहतूकीस प्रारंभ करावा. सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे गेल्यावर मा.महापौर ठरवतीलच.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद शहरात शहर बस वाहतूक उपक्रम राबविण्यासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी प्राप्त झालेली मे.अकोला प्रवासी व माल वाहतूक संस्था मर्यादित, अकोला यांची निविदा स्विकारणेस प्रस्तावातील अटी व शर्तीस अधीन राहून ''इंधन खर्चामध्ये वाढ झाल्यास तिकिटाचे दर वाढविण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद याऐवजी **तिकिटाचे दर वाढविण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आर.टी. ए.ला असेल** व आर.टी. ए. जी दरवाढ मंजूर करतील त्याच प्रमाणात रॉयल्टीचे दर ००.८० प्रति कि.मी. मध्ये वाढ होतील'' आणि अटी-शर्तीतील अ.क्र.२ मध्ये वाहनाचा रंग व डिझाईन मा.पदाधिकारी व मा.आयुक्त ठरवतील. या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८२ :**

उप आयुक्त (महसूल), यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा आठवडी बाजर फी वसूलीचा ठेका देण्यासाठी जहीर लिलाव/निविदा सूचना ज.क्र./मनपा/मामअ/१५३४/२००५ दिनांक १६.०९.२००५ रोजी वर्तमानपत्रात जहीर प्रसिध्दी देऊन मोफत सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण एक निविदा गेली. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत वेळेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली असून ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री.सय्यद नसीरोद्यीन स.सलाऊद्यीन, रक्कम रू.८२५०/- प्रती बाजर असा दर दिलेला आहे. दुपारी त्यांनी बोली बोलली, तेंव्हा त्यांना रक्कम रू.८२५०/- अंतिम बोली बोललेली आहे.

सदरील आठवडी बाजर फी वसूलीसाठी कार्यालयाने आधारभुत किमंत रू.९९९२/- प्रती माह असा दर ठरविला होता. प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये श्री.सय्यद नसीरोद्यीन स.सलाऊद्यीन यांनी रू.८२५०/- दर दिल्याने संबंधीतास चर्चासाठी दि.६.१०.२००५ बोलविले असता संबंधीतास जस्तीचे

दर रू.१०,०००/- प्रती बाजर दि.३१.०३.२००६ पर्यंत देण्याचे मान्य केल्याने जस्तीचा दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा आठवडी बाजर फी वसूलीचा ठेका देण्यासाठी प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार श्री.सय्यद नसीरोद्दीन स.सलाऊद्दीन यांना या बाजराचे फी वसूलीचा ठेका रू.१०,०००/- प्रती बाजर या दराने दि.३१.०३.२००६ पर्यंत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८३ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे/वि/इ/व उ बां.) यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगाव गट क्र.४ मध्ये दशनाम गोसावी समाज स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठीचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रूपये ९,९८,४००/- एवढ्याचे तयार केलेले होते, त्याप्रमाणे कामास मा.आयुक्त यांची मान्यता घेऊन व रितसर निविदा कार्यवाही करून कामाचे गुत्तेदार श्री.एम.एम.काझी यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने कामास सुरूवात करण्यात आली.

सदरील स्मशानभूमीच्या प्रत्यक्ष जगेवर मा.आयुक्त व मा.शहर अभियंता यांनी प्रस्तावित संरक्षित भिंतीचे वाढीव व अतिरिक्त काम करण्याबाबत आदेशीत केल्यानुसार व सदर काम तांत्रिकदृष्ट्या करणे आवश्यक असल्यामुळे वाढीव कामासाठी व अतिरिक्त कामाच्या बाबीसाठी रक्कम रू.१,०७,४६४/- इतका खर्च येणार असल्याने सदर वाढीव व अतिरिक्त कामामुळे मुळ अंदाजपत्रकात रू.१,०७,४६४/- इतकी वाढ होत असल्याने सुधारीत अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००४-२००५ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये ११,०५,८६४/- चे तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता वाढीव व अतिरिक्त कामाच्या तरतुदीच्या बाबीचे दुरूस्त अंदाजपत्रक रक्कम रूपये ११,०५,८६४/- ला सदरील काम करीत असलेले ठेकेदार श्री.एम.एम.काझी यांच्यातर्फे त्यांनी पूर्वी भरलेल्या निविदा दरा नुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगाव गट क्र.४ मध्ये दशनाम गोसावी समाज स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामामध्ये संरक्षित भिंतीचे वाढीव व अतिरिक्त कामाच्या बाबीसाठी रक्कम रू.१,०७,४६४/- ची वाढ होत असल्याने सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये ११,०५,८६४/- ला तसेच सदरील काम या कामाचे ठेकेदार श्री.एम.एम.काझी यांच्यातर्फे त्यांनी पूर्वी भरलेल्या निविदा दरा नुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.८४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्थायी समिती सभा दिनांक २७/०९/२००५ ठराव क्र.७३ अन्वये सर्व्हे क्रमांक ५३/२/१ व ५३/२/२ मो.गारखेडा ८० फुट व ४० फुट रूंद रस्त्याचा मोबदला देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणात प्रशासनातर्फे सभागृहात खुलासा करण्यात आला होता की, सदर प्रकरणात त्रृट्यांची पूर्तता करून स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवावा असे मा.आयुक्तांचे निर्देश होते. पुर्ततेनंतर मा.आयुक्तांची मंजूरी होणे आवश्यक होते. रंतु त्रृट्यांची पुर्तता केल्यानंतर मा.आयुक्तांची या प्रस्तावास मान्यता मिळाली असे गृहीत धरून नगर रचना विभागाने प्रस्ताव ठेवला होता सदर प्रस्ताव मंजूर

होण्यापूर्वी मा.आयुक्त रदेश दौऱ्यावर असल्याने त्यांनी दुरध्वनी वरून दिलेल्या सुचनेनुसार सदर प्रस्ताव मंजूर करू नये, असे सभागृहात प्रशासनाच्या वतीने स्थायी समिती सभागृहास विनंती करण्यात आलेली होती.

सदर प्रकरणात सद्य:स्थितीत प्रशासनाची दिशाभूल करून मोबदला घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आणि एका वेळेस चटई क्षेत्र निर्देशांक घेऊन पुन्हा मोबदल्याची मागणी करून महानगरपालिकेची फसवणुक होत असल्याबाबत संबंधीत मागणीदारा विरूध्द फौज्दारी स्वरूपाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणात चौकशी देखील होत आहे. त्यामुळे वरील परिस्थितीत सदर ठराव रद्द करणे योग्य वाटते. तसेच सभा कामकाजनियमावलीचे नियम क्रमांक ६६(१२) अन्वये एकदा मान्य झालेला ठराव तो ठराव करूनच बदला येतो किंवा रद्द करता येतो. अशी तरतुद असल्याने स्थायी समिती सभा दिनांक २७/९/२००५ रोजी मंजूर झालेला ठराव क्रमांक ७३ रद्द करणेसाठी सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्थायी समिती सभा दिनांक २७/०९/२००५ विषय क्र.७३ अन्वये सर्व्हे क्रमांक ५३/२/१ व ५३/२/२ मो.गारखेडा ८० फुट व ४० फुट रूंद रस्त्याचा मोबदला देण्यासंबंधीचा ठराव क्रमांक ७३ रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.८५ :</u>**

महानगरपालिका हद्दीतील गुंठेवारी बाधीत क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या कामांच्या उदा. विद्युत, ड्रेनेज, रस्ते, पाणी पुरवठा इत्यादीची देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक : रेणुकादास (राजुवैद्य)** **अनुमोदक : सौ. लता दलाल, रविकांत गवळी**

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : माझ्या वार्डात साफसफाईसाठी एकही मजूर नाही वार्ड-अ मध्ये एकूण २६९ मजूर असूतांना एकही सफाई मजूर काम करण्यासाठी वार्डात नाही. तसेच वार्डात अनधिकृत भागात लाईट बसविण्यात आले होते ते सध्या बंद आहेत. रमजनचा महिना चालू असून मुस्लीम बांधव सकाळी ४.०० वाजता उठतात, त्यांना अंधारात मस्जिदमध्ये जवे लागते. दुरूस्तीचे काम होत नसेल तर अगोदर का लाईट बसविण्यात आलेले होते.

मा.आयुक्त : गुंठेवारीचा सर्व्हे सुरू केलेला असून रेग्यूलाईज झाल्यानंतर अनधिकृत वस्तीत काम केले जईल तोपर्यंत नाही.

श्री.रविकांत गवळी : स्वेच्छा निधीतून जे लाईटची कामे केलेली आहे त्याची देखभाल दुरूस्ती करता येते असे यात नमूद आहे.

श्री.शंशाक विसपुते : ज्या ठिकाणी लाईट आहे त्याचे देखभाल दुरूस्तीचे काम झाले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

श्री.रविकांत गवळी : सन २००१ पूर्वी स्वेच्छा निधीतून जे कामे झाली त्याची देखभाल दुरूस्तीची कामे झाली पाहिजे

श्री.नासेर नहदी : लाईटच्या कामासाठी गेल्या अर्थसंकल्पात तरतूद होती परंतू कामे सुरू होण्या आधीच बजेट संपलेले आहे असे सांगण्यात आले. बरीच कामे स्पीलओव्हर मध्ये आली, ती सुध्दा आता होत नाही.

मा.सभापती : देखभाल दुरूस्तीची कामे अनधिकृत वसाहती मध्ये करण्याची मागणी केलेली आहे. कोणतेही काम या भागात होणार नाही अशी प्रशासनाची भुमिका आहे. या बाबत शासनाचे आदेश काय आहेत? अनधिकृत भागात जेजेकाम यापूर्वी झालेले आहे त्याचे देखभाल दुरूस्तीचे काम का करता येत नाही. शासन आदेश काय आहे तसेच स्वेच्छा निधी वापरता येतो की नाही, याबाबत शासनाचे आदेश काय सर्व बाबींचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : गुंठेवारीमध्ये येणारे कोणते क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात नाही गुठेवारीचा सर्वेचे काम चालू आहे. शासनाचे लेखी आदेश सुध्दा आले की जेबॉण्ड पेपरवर खरेदी झाली, ती सुध्दा आपण आता पुरावा म्हणून गृहीत धरू शकतो. जे पर्यंत रेग्यूलर होत नाही तो पर्यत रस्ते ताब्यात घेवू शकत नाही. गुंठेवारीची एक इंच जगा ताब्यात नाही अधिकृतपणे पैसे खर्च करता येत नाही. सर्वेक्षण चालू आहे पूर्ण सर्वेक्षण झाल्यानंतर त्यात्या भागांचे कामाचे अंदाजपत्रक सुध्दा तयार करण्यात येतील. कमीत कमी ७५-८०टक्के लोकांनी रेग्युलाईज करण्यासाठी पैसे भरावे. सर्वसाधारण सभेने ज्या दराने मान्यता दिली त्याप्रमाणे त्या भागातील लोकांनी गुंठेवारीत रेग्यूलर करावे त्यानंतरच काम करता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य : गुंठेवारी भागात स्वेच्छा निधीतून लाईट लावू शकतो का? याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : महानगरपालिकेच्या ताब्यात त्या जगा नाही त्यामुळे काम करू शकत नाही.

मा.सभापती :या सभागृहाने गुठेवारी कायदा लागू करण्यास मान्यता दिली. ते काम चालू आहे. परंतू जेपर्यंत हे काम पूर्ण होत नाही तोपर्यत या वर्षी अर्थसंकल्पात त्या भागात काम करण्यासाठी तरतूद ठेवलेली आहे. महानगरपालिकेच्या सर्व नागरीकांना सुविधा देण्याबाबत दुमत नसावे. मी स्वत: पाहणी केली पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या चदंनगनर, रामवाडी, येरवडा या भागात लोकप्रतिनिधींचा निधी वापरण्यात आला. त्या अनधिकृत वसाहतीत सुविधा देण्यात आल्या. या महानगरपालिकेत का दिल्या जत नाही. सर्व महापालिकेस सारखेच नियम आहेत. अशा वसाहतीमधे काम करता येत नाही, कोणत्या नियमानुसार करता येत नाही सर्व खुलासा करावा. तसे शासनाचे परीप्रत्रक आहे का, याची सर्व माहिती प्रशासनाने लेखी स्वरूपात सादर करावी. अनधिकृत भागात स्वेच्छानिधीतून विकास कामे करता येतील असे स्पष्ट म्हटलेले आहे.

मा.आयुक्त : गुंठेवारीमध्ये कोणतेही काम करण्यास बेसीक अडचण ही ॲक्ट नुसारच येते. प्रशासनाच्या ताब्यात काहीही नाही गुंठेवारी झाल्यानंतर एकदम तो भाग ताब्यात घेतला जईल. जी कामे असतील ती केली जतील. ज्या ओपन स्पेस आहे त्या एकतर्फी ताब्यात घेतो आहे. ओपन स्पेस तशा ताब्यात मिळणार नाही. गुंठेवारी मध्ये रेग्यूलाईजकेल्यास ताब्यात येतील.

मा.सभापती :नवीन जगेचा प्रश्न नाही. यापूर्वी जेकाम केलेले आहे त्याची देखभाल दुरूस्तीची कामे करण्याबाबत स.सदस्यांचे मत आहे.

मा.आयुक्त : प्रशासन काम करण्यास तयार आहे किमान त्या त्या भागातील नागरीकानी ८० टक्के लोकांनी रेग्यूलाईज साठी अर्ज करावे. ते ही करणार नसेल जी रक्कम भरायची ती ही भरणार नसेल तर पैसे खर्च करू शकत नाही.

सौ.लता दलाल अनेक वस्त्या ह्या १९७१,१९८०,१९८९ पासूनच्या आहेत. या वस्त्यात यापूर्वी महानगरपालिकेने सर्व विकास कामे केलेली आहेत. त्या कामाची देखभाल दुरूस्तीची कामे करावी व ही कामे करण्यात यावीत यासाठी शासनाकडे अनेक महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार केलेला होता. अशा वस्त्यामध्ये देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास शासनाची कोणतीही हरकत नाही हे खात्रीने माहिती आहे. बांधकामे नियमित करण्यासाठी आम्ही प्रशासनास मदत करू परंतु त्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी.

मा.सभापती : गुंठेवारी अंतर्गत येत असलेल्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे मा.आयुक्त यांना करावीच लागतील असा ठराव सर्व सदस्यांच्या सम्मतीने सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : जधववाडी भागात लाईट पोल बसविणे ई. कामे यापूर्वी करण्यात आलेली आहे रस्त्याची कामे सुध्दा केलेली आहे. परंतू २००२ पासून देखभाल दुरूस्तीचे काम होत नाही.

मा.आयुक्त : सन २००१ नंतर गुंठेवारी कायदा लागू झाला. गुंठेवारी भाग रेग्यूलाईज केल्या नंतर सर्व भागात काम करण्यास प्रशासन तयार आहे. एखादे बांधकाम परवानगी द्यायची त्यासाठी विकास निधी वसूल करतो किंवा संबंधीतास विकास करण्यास भाग पाडतो. गुठेवारी भागातून आपण आता पर्यत विकास निधी घेतलेला नाही मालमत्ता कर घेत आहोत. गुठेवारी भाग रेग्यूलाईज करून घेऊ त्यानंतर कामे करता येतील. सर्वे करून रेग्यूलाईजझाल्यानंतर काम करण्याचे अंदाजपत्रक सुध्दा करण्यात येतील.

श्री.रेणुकादास वैद्य : २००१ नंतर गुंठेवारी बाधीत क्षेत्रात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास कोणतीही हरकत नसावी अशी या सभागृहाची भुमिका आहे. म्हणून गुंठेवारी अंतर्गत येणाऱ्या ज्या भागात मनपाने कामे केलेली आहेत तेथील देखभाल दुरूस्तीची कामे करण्याबाबतचा प्रस्ताव मी आजच्या सभेत सभागृहापुढे ठेवत आहे. त्यास सभागृहानेमान्यता द्यावी, अशी विनंती आहे.

श्री.रविकांत गवळी : या ठरावास माझे अनुमोदन आहे.

मा.आयुक्त : सर्वे करण्याचे काम चालू आहे जेदर ठरवलेले आहे ते रेग्यूलाईजबांधकामा पेक्षा कमी आहे. रेग्यूलाईजकरणे जस्त सोयीचे होईल.

सौ.लता दलाल : स.सदस्य श्री.रेणूकादास वैद्य यांनी जे ठराव मांडला त्यास मंजूरी देण्यात यावी.

श्री.मुजीब खान : ज्या वसाहती अत्यंत जुन्या आहेत त्याही गुंठेवारी मध्ये घेतलेल्या आहेत. त्यामुळे काम करण्यास अडचण होते. काही ठिकाणी सुविधा दिल्या जतात तर काही ठिकाणी नाही. खालचे अधिकारी मनमानी करीत आहेत जी कामे यापूर्वी झालेली आहेत त्याची देखभाल दुरूस्ती होणार नसेल तर योग्य नाही.

मा.आयुक्त : ज्या जुन्या वसाहती आहेत त्यापैकी कोणत्या वसाहती गुंठेवारीत येत नाही व कोणत्या येतात त्याची यादी दिली जईल.

मा.सभापती : गुठेवारीच्या अंतर्गत ज्या वसाहती येत आहेत व यापूर्वी या वसाहतीत ड्रेनेज, लाईट, रस्त्याची तसेच पाणी पुरवठयाची कामे स्वेच्छा निधीतून व मनपा फंडातून केलेली आहेत अशा सर्व वसाहतीमध्ये देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावीत. अशा सुचना मा.आयुक्त यांनी संबधीत अधिकाऱ्यांना कराव्यात असा ऐनवेळचा ठराव या स्थायी समितीध्ये सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. या

ठरावास ज्यांचा पाठींबा आहे त्यांनी हात वर करावे (याच वेळी सर्व स.सदस्य हात वर करतात).१००टक्के मान्यता आहे. शासनाचा अडसर आहे असे कारण दाखवू नये. अशा सुचना देण्यात येत असून जे गुंठेवारीचा सर्व्हे चालू आहे त्यानुसार वसाहती रेग्यूलाईज करण्यासाठी आम्ही सर्व सदस्य मदत करू. बजेट मधे जे २.५० कोटीची तरतूद या भागासाठी देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी ठेवलेली आहे ती खर्च करण्यात यावी व उद्यापासून अशा भागात कामे करण्यास सुरूवात करावी अशा सुचना सर्वानुमते देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या सविस्तर चर्चेअंती ठरल्यानुसार गुंठेवारीच्या अंतर्गत येणाऱ्या वसाहतीत ड्रेनेज, लाईट, रस्त्याची तसेच पाणी पुरवठयाची कामे स्वेच्छा निधीतून व मनपा फंडातून केलेली आहेत, अशा सर्व वसाहतीमध्ये देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे. मा.आयुक्तांनी सर्व संबधीत अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात असा ठराव आजच्या सभेमध्ये सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. बजेटमध्ये असलेल्या २.५० कोटीच्या तरतूदीतून देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी खर्च करण्यात यावा व तात्काळ अशा भागात कामे करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेकडून बी.ओ.टी. तत्वावर प्रकल्प विकसीत करावयाचे काम हाती घ्यावयाचे आहे.

बी.ओ.टी. तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पाचे तांत्रिक/आर्थिक निकषा आधारे छानणी करणे, प्रकल्पाचा सर्वंकष निकषा आधारे फिजीबीलीटी अहवाल दाखल करणे, प्रकल्पाचे विकासाचे टप्प्यावर प्रकल्पासाठीचे विकासक (डेव्हलपर) यांचेकडून करारनामा अटीनुसार प्रकल्प पूर्ण करणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे व त्याबाबत अहवाल सादर करणे इ. कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची राहील. सदर कामासाठी वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक करणेस्तव बी.ओ.टी. समितीने निर्देशित केले आहे. वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५% (दीड टक्का) इतकी रक्कम मोबदला स्वरूपात देय राहील. सदरहु प्रमाणे वास्तुविशारद नेमणूकी बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात यावेत.

तरी बी.ओ.टी. प्रकल्प देखरेख कामावर वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक साठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बी.ओ.टी. तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पाचे तांत्रिक/आर्थिक निकषा आधारे छानणी करणे, प्रकल्पाचा सर्वंकष निकषा आधारे फिजीबीलीटी अहवाल दाखल करणे, प्रकल्पाचे विकासाचे टप्प्यावर प्रकल्पासाठीचे विकासक (डेव्हलपर) यांचेकडून करारनामा अटीनुसार प्रकल्प पूर्ण करणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे व त्याबाबत अहवाल सादर करणे इ. कर्तव्ये पार पाडण्यासाठी वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक करण्यास तसेच त्यांना वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून प्रकल्पाचे अं.प.रक्कमेच्या १.५% (दीड टक्का) इतकी रक्कम मोबदला स्वरूपात देण्यास आणि वास्तुविशारद नेमणूकी बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : वार्ड क्र.१३, ४२, ४७, ६२,९४, ९५ व ९८ चे स.सदस्य सौ. मसर्रत बेगम युनुस पटेल, श्री.मुजेब आलमशाह खान, सौ.छाया विलास राऊत, डॉ.भागवत कराड,सौ.अल्पा विकास जैन, श्री.गजनन बारवाल व सौ.अनिता घोडेले या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वार्ड क्र.१३, ४२, ४७, ६२,९४, ९५ व ९८ या प्रभागातील विविध कामासाठी लेखाशिर्ष बदलणे, आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १३ | १३६ | वार्ड क्र.१३ दिल्लीगेट ते आझाद कॉलेज रोडवर सार्वजनिक शौचालय बांधणे - २.०० लक्ष | वार्ड क्र.१३ गीतानगर येथे मनपा शालेय इमारतीतील विविध विकास कामे करणे | **२.०० लाख** |
| | १२२ | प्रभाग क्र.१३ गीतानगर येथे मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे - ५.०० | वार्ड क्र.१३ गीतानगर मागील वस्तीमध्ये दगडी गटार बांधणे | **५.०० लाख** |
| ४२ | १५०/७९ | चंपा मस्जीद ते रोशनगे रस्त्याचे डांबरीकरण करणे - ३.०० लक्ष | १. मकसुद कॉ.रोशनगेट भागात मोठ्या व्यासाची ड्रेनेजलाईन टाकणे<br>२. मकसुद कॉ.रोशनगेट भागात ट्युबलर पोल्स लावणे | **२.०० लक्ष<br>१.०० लक्ष** |
| | १५२/१४ | रोशनगेट येथे वाहतुक बेटाची दुरूस्ती करणे - १.०० लक्ष | रोशनगेट प्रभागातील मुख्य गटारीवरील लोखंडी जळ्या कॉंक्रेटींग दुरूस्ती करणे | **१.०० लाख** |
| ४७ | १४७/४२ | <u>अति.शहर अभियंता विभाग</u><br>वॉर्ड क्र.४७ मध्ये विविध भागात कॉंक्रेटींग करणे - ४.०० लक्ष | <u>शहर अभियंता विभाग</u><br>वॉर्ड क्र.४७ मध्ये विविध भागात कॉंक्रेटींग करणे . | **४.०० लाख** |
| ६२ | १३५/२७ | पोलीस कॉलनी, क्रांतीचौक येथे खेळणी बसविणे - २.५० लक्ष | म्हाडा कॉलनी, पुष्पनगरी येथे पूल बनविणे | **२.५० लाख** |
| | १३३/७२ | वॉर्ड क्र.६२ मध्ये खेळणी बसविणे - ४.०० लक्ष | भाग्यनगर मध्ये फुटपाथ बनविणे | **४.०० लाख** |
| | १३३/६१ | वार्ड क्र.६२ मध्ये लहान मुलांसाठी खेळणी बसविणे - ३.०० लक्ष | औरंगाबाद अशोका हॉटेल नवीन वसाहतीत ड्रेनेजलाईन टाकणे | **३.०० लाख** |
| | १४३/४५ | वॉर्ड क्र.६२ मधील समानगर येथील रस्त्याचे रूंदीकरण करणे-५.००लक्ष | वॉर्ड क्र.६२ मधील पाण्याचे टाकीसून भिमसंदेश चौक या रस्त्याच्या दोन्ही बाजुनी फुटपाथ बनविणे | **५.०० लाख** |
| | १६९/२३ | वॉर्ड क्र.६२ चिंतामण कॉलनी येथे जलवाहिनी बदलणे, नवीन ए.सी.जलवाहिनी टाकणे-२.०० लक्ष | औरंगाबाद अशोका हॉटेल नवीन वसाहतीत नवीन जलवाहिनी टाकणे | **२.०० लाख** |
| | १८३/८१ | शांतीनिकेतन कॉलनी येथील ड्रेनेज लाईन बदलणे - २.०० लक्ष | समतानगर येथील मधुर हॉस्पीलटल ते मेशराम सरांच्या घरार्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे | **२.०० लाख** |
| | १८७/१५ | वॉर्ड क्र.६२ शिवाजे कॉलनी येथील नाल्यावर पाईप बसविणे-५.०० लक्ष | वॉर्ड क्र.६२ भाग्यनगर मधील डांबरीकरण करणे | **५.०० लाख** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७० | १६६/९६ | वॉर्ड क्र.७० अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे - ३.५० लक्ष | **१.** वार्ड क्र.७० मधील सारंग सोसायटी ते गजनन कॉलनी रस्यावर पूल बांधणे | **६.५० लाख** |
| | १८५/११६ | प्रभाग ७० विविध ठिकाणी असलेल्या ड्रेनेजलाईनचे अप्रुटींग करणे - १.०० लक्ष | **२.** वॉर्ड क्र.७० विद्यानगर येथे मनपा खुल्या जगेस संरक्षित भिंत बांधणे. | **३.०० लाख** |
| | १३५/४५<br>१३५/४६ | **१.** वॉर्ड क्र.७० विद्यानगर येथे मनपा खुल्या जगेस संरक्षित भिंत बांधणे- ४.०० लक्ष (पैकी १ लक्ष रूपये पूलाचे कामासाठी वळती करणे)<br>**२.** प्रभाग क्र.७० चैतन्यनगर येथे मनपा खुली जगा विकसित करणे - ४.०० लक्ष(पैकी १ लक्ष रूपये पूलाचे कामासाठी वळती करणे) | **३.** प्रभाग क्र.७० चैतन्यनगर येथे मनपा खुली जगा विकसित करणे | **३.०० लाख** |
| ९४ | १४९/३९ | **लेखाशिर्ष-पुनर्डांबरीकरण**<br>जलाननगर रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे व फुटपाथ बांधणे-६ लक्ष | **लेखाशिर्ष-नवीन खडी रस्ते**<br>वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत जलाननगर व मगरबी कॉलनी येथे खडीकरण व फुटपाथ बांधणे | **६.०० लाख** |
| | १४२/१४ | **लेखाशिर्ष-नवीन डांबरीकरण**<br>उड्डाण पुलाखालील एसटी वर्कशॉप समोरील रस्याचे डांबरीकरण करणे- ५.०० लक्ष | **लेखाशिर्ष-पुनर्डांबरीकरण**<br>वॉर्ड क्र.९४ अंतर्गत ज्हागिरदार कॉ.व मगरबी ले आऊट, जलाननगर इ.ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणे | **५.०० लाख** |
| | १४७/५८ | **लेखाशिर्ष-कॉंक्रीट रस्ते**<br>ज्हागिरदार कॉलनी येथे मजबुतीकरण व फुटपाथ बांधणे - ५.०० लक्ष | **लेखाशिर्ष-पुनर्डांबरीकरण**<br>प्रभाग क्र.९४ अंतर्गत ज्हागिरदार कॉलनी व मगरबी ले-आऊट, जलाननगर इ.ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणे | **५.०० लाख** |
| ९५ | १४६/२१ | नयी बस्ती येथे आर.सी.सी.रोड तयार करणे - ३.०० लक्ष | वार्ड क्र.९५ पदमपुरा येथे आरसीसी रोड तयार करणे | **३.०० लाख** |
| ९८ | १४३/५४ | प्रभाग क्र.९८ मधील अभिनंदन सोसायटी, आनंदविहार ते नाथपुरम खडीकरण व डांबरीकरण करणे - रू.४.०० लक्ष-**काम रद्द करणे** | **(अ.क्र.५४ व ५५ ची एकत्रित तरतुद-४ +१० =१४.०० लक्ष)**<br>**१.** वार्ड क्र.९८ अंतर्गत नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा परिसरात विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण, मजबुतीकरण तसेच पुनर्डांबरीकरण करणे. | **११.५० लक्ष** |
| | १४३/५५ | प्रभाग क्र.९८ इटखेडा येथील २४ मीटर विकास योजना रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - १०.०० लक्ष- **काम रद्द करणे.** | **२.** कांचनवाडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ बहुउद्देशीय हॉल बांधणे | **२.५० लक्ष** |

'राष्ट्रगीतानंतर' सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद